# पंचायती राज समिती

(२०१०-२०११)

(बारावी विधानसभा)

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या सन २००३-२००४ च्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील सांगली व ठाणे जिल्हा परिषदांच्या संदर्भातील परिच्छेदाबाबत

# पहिला अहवाल

एचबी-२२२५-१.

# पंचायती राज समिति

## (२०१०-२०११)

**समिति प्रमुख**

१ श्री. बबनराव शिंदे, वि.स.स.

**समिति सदस्य**

२ ॲड. के.सी.पाडवी, वि.स.स.

३ श्री. माधवराव पवार, वि.स.स.

४ श्री. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स.

५ श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

६ श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

७ श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

८ श्री. बच्चू उर्फ ओमप्रकाश कडू, वि.स.स.

९ श्री. उदय सामंत, वि.स.स.

१० श्री. बापुसाहेब पठारे, वि.स.स.

११ श्री. आण्णा बनसोडे, वि.स.स.

१२ श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१३ श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.

१४ श्री. सुरेश खाडे, वि.स.स

१५ श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.

१६ श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

१७ श्री. अनिल भैय्या राठोड, वि.स.स.

१८ श्री. विजयराव औटी, वि.स.स.

१९ श्री. दादाजी भुसे, वि.स.स.

२० श्री. नितीन भोसले, वि.स.स.

२१ प्रा. सुरेश नवले, वि.प.स.

२२ *रिक्त

२३ ॲड. उषा दराडे, वि.प.स.

२४ श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

२५ श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव,

श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव,

श्री. विलास आठवले, अवर सचिव,

श्री. सुभाष नलावडे, कक्ष अधिकारी,

---

*सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे, वि. प. स. यांची दिनांक ५ डिसेंबर, २०१० रोजी सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे रिक्त.

# पंचायती राज समिती

## (२००८-२००९)

**समिती प्रमुख**

१. श्री. सुभाष ठाकरे, वि.स.स.

**समिती सदस्य**

*२. श्री. राजन पाटील, वि.स.स.

३. श्री. रमेशभाई कदम, वि.स.स.

४ श्री. माणिकराव जगताप, वि.स.स.

५ श्री. संपतराव अवघडे, वि.स.स.

६ श्री. श्रीनिवास देशमुख (गोरठेकर), वि.स.स.

**७ रिक्त

८ श्री. पी. एन. पाटील, वि.स.स.

९ श्री. सुभाष बने, वि.स.स.

१० श्री. राजेंद्र मुळक, वि.स.स.

११ श्री. पद्माकर वळवी, वि.स.स.

१२ श्री. डी.एस.अहिरे, वि.स.स.

१३ श्री. आशिष जयस्वाल, वि.स.स.

१४ श्री. तुकाराम सुर्वे, वि.स.स.

१५ श्री.अण्णासाहेब माने-पाटील, वि.स.स.

१६ श्रीमती अनुराया खेडकर, वि.स.स.

१७ श्री. अतुल देशकर, वि.स.स.

१८ श्री. टी. पी. कांबळे, वि.स.स.

१९ श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

२० श्री. हेमंत पटले, वि.स.स.

२१ श्री. राजन तेली, वि.प.स.

२२ श्री. एम. एम. शेख, वि.प.स.

२३ श्री. विक्रम काळे, वि.प.स.

२४ श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

२५ श्री. रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव,

श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव,

श्री. वि. वा. देशमुख, उप सचिव,

श्री. ता. नि. मिसाळ, अवर सचिव,

# पंचायती राज समिति

## (२००७-२००८)

**समिति प्रमुख**

१. श्री. राजन पाटील, वि.स.स.

**समिति सदस्य**

२. श्री. नानाभाऊ पंचबुध्दे, वि.स.स.

३. श्री. दिलीप बनसोड, वि.स.स.

४. श्री. रमेशचंद्र बंग, वि.स.स.

५. श्री. माणिकराव जगताप, वि.स.स.

६. श्री. श्रीनिवास देशमुख (गोरठेकर), वि.स.स.

*७. श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.

८. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.

९. श्री. सुभाष बने, वि.स.स.

१०. श्री. राजेंद्र मुळक,वि.स.स.

११. श्री. विरेंद्र जगताप, वि.स.स.

१२. श्री. सुनिल केदार, वि.स.स.

१३. श्रीमती मनिषा निमकर, वि.स.स.

१४. श्री. कैलास पाटील, वि.स.स.

१५. श्री. विश्वास नांदेकर, वि.स.स.

१६. श्री. संजय राठोड, वि.स.स.

१७. श्री. अतुल देशकर, वि.स.स.

१८. श्री. उत्तम इंगळे, वि.स.स.

१९. श्री. साहेबराव घोडे, वि.स.स.

२०. श्री. सदाशिव लोखंडे, वि.स.स.

**२१. रिक्त

२२. श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.

२३. श्री. शिवाजीराव पाटील, वि.प.स.

२४. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

२५. श्री. रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव,

श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव,

श्री. वि. वा. देशमुख, उप सचिव,

* सन्माननीय सदस्य श्री. दिलीपकुमार सानंदा यांनी पंचायती राज समितीच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या पदावर दिनांक २४ जुलै, २००७ रोजी श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांची समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आली.

** श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांची दिनांक २४ फेब्रुवारी, २००८ रोजी सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे पद रिक्त आहे.

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा "समिती प्रमुख" या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा पहिला अहवाल सादर करीत आहे.

सन २०१०-२०११ करिता समिती दिनांक ४ मार्च, २०१० रोजी गठित झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात सन २००७-२००८ साठी गठीत झालेल्या समितीने सांगली, ठाणे, या जिल्हा परिषदांची सखोल तपासणी केली.

समितीने सांगली जिल्हा परिषदेस दिनांक २१, २२ व २३ ऑगस्ट, २००७ रोजी भेट देऊन श्री.गोकूळ मवारे, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री. रविंद्र शेळके, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, सांगली जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

समितीने ठाणे जिल्हा परिषदेस दिनांक २३, २४ व २५ ऑक्टोबर, २००७ रोजी भेट देऊन श्री. सु.रा.हजारे, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री. रविंद्र सावंत, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, ठाणे जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

सन २००८-२००९ करिता गठीत झालेल्या समितीने सांगली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या, तसेच साक्षीचे वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक २६ जून, २००९ रोजी संबंधित मंत्रालयीन विभागाच्या सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

सन २०१०-२०११ करिता गठीत झालेल्या समितीने ठाणे परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या, तसेच साक्षीचे वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक ११ व १२ मे, २०१० रोजी संबंधित मंत्रालयीन विभागाच्या सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचे वेळी श्री. बलदेव सिंह, सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, श्री. एन. आरुमुगम प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, श्री. सु.स.सनगर, उप सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या सांगली, ठाणे, जिल्हा परिषदांच्या कामकाजांची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१०-२०११ साठी गठित झालेल्या समितीने दिनांक ९ डिसेंबर, २०१० रोजीच्या बैठकीत अहवाल विचारात घेऊन संमत केला.

**विधान भवन :**
नागपूर,
दिनांक : ९ डिसेंबर, २०१०.

**बबनराव शिंदे,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरण क्रमांक | विषय | परिच्छेद क्रमांक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | **प्रकरण एक** | | |
| (१) | | **सांगली जिल्हा परिषद** | | |
| | १.१ | जिल्हा परिषद, सांगली येथे सिटी सर्व्हे नं. ५१८ मध्ये नवीन विस्तारीत प्रशासकीय इमारत बांधकाम खर्चातील अनियमितता. | ३.१२३ | १ |
| | १.२ | सन २००३-२००४ च्या वर्षात जिल्हापरिषदेमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (कर्ज वसुली थकबाकी) | ३.५६८ | ८ |
| | | **प्रकरण दोन** | | |
| (२) | | **ठाणे जिल्हा परिषद** | | |
| | २.१ | गणवेश कापड खरेदी सन २००२-२००३ | ३.४३ | ११ |
| | २.२ | सन २००३-२००४ या वर्षात जिल्हापरिषदेमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (कर्ज वसुली थकबाकी) | ३.५६८ | १९ |
| (३) | | **परिशिष्ट** | | |
| | | समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त | | २९ |

## प्रकरण एक

# सांगली जिल्हा परिषद (लेखा)

**१.१ जिल्हा परिषद, सांगली येथे सिटी सर्व्हे नं.५१८ मध्ये नवीन विस्तारीत प्रशासकीय इमारत बांधकाम खर्चातील अनियमितता. (परिच्छेद क्रमांक ३.१२३) :-** सन २००३-२००४ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील (परिच्छेद क्रमांक २५) सांगली जिल्हा परिषदेमार्फत विस्तारीत प्रशासकीय इमारत बांधकामावर १३ प्रमाणकान्वये रक्कम रुपये १,०९,२६,५६७ एवढा खर्च करण्यात आला त्याबाबत लेखापरिक्षकांचे खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.----

(१) सदर कामासाठी मे. नेहरकर कन्स्ट्रक्शन्स, कराड यांची ९.९० टक्के जादा दराची एकमेव निविदा प्राप्त झाली होती. शासन आदेशानुसार फेर निविदा मागविण्याची कार्यवाही का केली नाही याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

(२) शासनाचे दिनांक १८ फेब्रुवारी १९९३ चे परवानगीनुसार व जिल्हा परिषद ठरावानुसार घसारा निधीतून उचललेली रक्कम रुपये १,२३,२३,००० ही १५ वार्षिक हप्त्यात घसारा निधीत परत जमा करावयाची आहे. तथापि ती जमा झाल्याची लेखापरीक्षणाची खात्री झाली नाही. याबाबत खात्री पटविणे आवश्यक आहे.

(३) सदर कामावर घसारा निधीतून १.२० कोटी खर्च करण्यास शासनाने मंजुरी दिली होती. प्रत्यक्ष खर्च रुपये १२३.२३ लाख झाले आहेत. जादा खर्च रक्कम रुपये ३.२३ लाखाला शासनाची मान्यता प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

(४) मुख्य इमारत बांधकामाचे मूळ प्राकलन रुपये ८८,३४,००० चे असून मंजूर निविदा (१.९९ जादा) चा जादा खर्च रुपये १,७५,७९७ विचारात घेता रुपये ९०,०९,७९७ इतका खर्च अपेक्षित होता. तथापि प्रत्यक्ष खर्च रुपये १,०९,२६,५६७ असून जादा खर्च रुपये १९,१६,७७० ला जिल्हा परिषदेची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

(५) कामाची मुदत २४ महिने होती. काम दिनांक १८ डिसेंबर १९९८ अखेर पूर्ण होणे आवश्यक होते. प्रत्यक्षात काम दिनांक ३१ डिसेंबर २००० रोजी पूर्ण झाले. टेंडर शर्तीनुसार ठेकेदारास प्राईज व्हेरीएशनची रक्कम द्यावयाची होती. या कामासाठी ठेकेदारास २ वर्षे विनादंड मुदतवाढ देऊन ठेकेदाराचे हित जपण्यात आले आहे. मुदतवाढ देताना प्राईज व्हेरीएशनमुळे येणारा खर्च विचारात घेतला नसल्याने रक्कम रुपये ८,६३,९२२ इतका नाहक खर्च झालेला आहे. त्यास शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

(६) मोजमाप पुस्तके पाहता नोंदीमध्ये परिगणना चुकीची केल्याने रक्कम रुपये ५७,७९५ चे अतिप्रदान झाले आहे. सदर रक्कम संबंधितांकडून वसुली करुन घसारा निधीत जमा करणे आवश्यक आहे.

(७) सुरक्षा अनामत परतावा पाहता रुपये ४०,२७७ दुबार परतफेड झाल्याचे दिसून येते. याबाबत खातरजमा करून संबंधिताकडून रुपये ४०,२७७ ची वसुली करणे आवश्यक आहे.

(८) ठेकेदाराकडून रुपये २,१८,५३१ प्राप्तीकर वसुली करण्यात आला आहे. तथापि, १० टक्के सरचार्ज रुपये २१,८५३ वसुली न करता रुपये १,००२ वसुली केल्याने कमी वसुली रक्कम रुपये २०,८५१ संबंधितांकडून वसुली करून शासन निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

(९) कामाचा करारनामा रुपये २० च्या मुद्रांक पेपरवर करण्यात आला आहे. मुद्रांक अधिनियमानुसार सुरक्षा अनामत रकमेच्या ३ टक्के म्हणजेच रुपये १०,६०० च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करणे आवश्यक होते. कमी मुद्रांक शुल्क रुपये १०,५८० ची वसुली करून शासन निधीत जमा करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हापरिषद, सांगली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला :----**

(१) जिल्हापरिषद नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाची जाहीर निविदा दैनिक पुढारी, दैनिक राष्ट्रशक्ती, दैनिक इंडियन एक्सप्रेस, मुंबई या वृत्तपत्रातून दि. ३-७-९६ रोजी प्रसिध्दीस दिली. त्यानुसार एकूण चार निविदांची विक्री झाली. विक्री झालेल्या निविदाधारकांपैकी मेसर्स श्री. नेहरकर कंस्ट्रक्शन, मु.पो. कराड यांची एकमेव ९.९० टक्के जादा दराची निविदा प्राप्त झाली. महाराष्ट्र पब्लीक वर्क्स मॅन्युअल मधील नियम क्र. २०८ मधील टीप क्र. २ (बी) नुसार सदरची एकमेव निविदा मधील दर वाटाघाटीने कमी करणेकामी जिल्हापरिषद ठराव क्र. १३५३, दि. १९-१०-९६ अन्वये निर्णय घेणेत आला. त्याप्रमाणे वाटाघाटी समितीने सदरची निविदा १.९९% जादा दराने मंजूर करावी असा निर्णय घेऊन दि. ६-१२-९६ च्या जिल्हा-परिषद सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र. १४१० अन्वये मान्यता दिली आहे. त्यामुळे फेर निविदा मागविण्याचा प्रश्न आला नाही.

(२) घसारा निधीतून उचललेल्या रु.१,२०,००,०००/- रकमेपैकी रु.४४,००,००० इतकी रक्कम दि. ३०-३-९९ पासून दि. ३०-४-२००७ पर्यंत घसारा निधीमध्ये जमा केलेली आहे. उर्वरित राहीलेली रक्कम दरवर्षी हप्त्याने घसारा निधीमध्ये जमा करण्याची दक्षता घेत आहे.

(३) या कामासाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता व जिल्हा-परिषद ठराव क्र. ११४९ दि. १७-१-९६ अन्वये रक्कम.रु. १,२०,००,००० इतक्या रकमेस दिलेली आहे. जादा खर्च मुख्यत्वे भाव वाढीमुळे झाला आहे. त्यामुळे सदरहू जादा खर्च अनुज्ञेय ठरतो. तथापि, या

कार्यालयाकडील पत्र क्र. बांधकाम/ प्रकल्प- ३/२२३/२००३, दि. २८-३-२००३ अन्वये मा.सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय, मुंबई यांच्याकडे जादा खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

(४) वर नमूद केलेप्रमाणे या कामाकरीता जिल्हापरिषदेने रुपये १,२०,००,००० इतक्या रकमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. या रकमेच्या मर्यादेत मुख्य इमारतीचे बांधकाम करण्यात आलेले असल्याने मुख्य इमारतीच्या कामावरील जादा खर्चास पुन्हा स्वतंत्रपणे जिल्हापरिषदेची मंजुरी घेणेची आवश्यकता नाही.

(५) सदर कामाची मूळ मुदत दि. १९-१२-९६ ते दि. १८-१२-९८ अखेर एकूण २४ महिन्यांची होती. शासनाने दि.१८-२-९३ रोजी घसारा निधीतून रु.६० लाख इतकी रक्कम खर्च करण्यास मान्यता दिली होती. त्याप्रमाणे संबंधित मक्तेदारास मूळ मुदतीत केलेल्या कामाचेपोटी दि. १२-११-९८ पर्यंत रु.६० लाख इतक्या रकमेची अदाई झालेली आहे. उर्वरीत रक्कम.रु.६० लाख इतकी रक्कम घसारा निधीतून खर्च करणेस शासनाने दि. २४-४-२००० रोजी मान्यता दिली आहे. म्हणजे जवळ जवळ दीड वर्षे संबंधित मक्तेदारास त्यांनी केलेल्या कामापोटी बिलाची अदाई न झाल्याने मुदत वाढ द्यावी लागली आहे. या कालावधीतील दरभाव वाढ संबंधित मक्तेदारास देणे क्रमप्राप्त ठरले आहे. त्यामुळे नाहक खर्च झाला असे म्हणता येणार नाही किंवा संबंधित मक्तेदाराचे हित जपले असे म्हणणे संयुक्तिक वाटत नाही.

(६) मोजमाप पुस्तक क्रमांक ३६५५, पान क्र. ८६ वर स्टीलचे वजन १९४ कि.ग्रॅ. जादा परिगणनेमुळे रु. ३,७८० व मोजमाप पुस्तक क्र. ३६५८ मधील पान क्र. ६२ वर सळीचे माप रकाना क्रमांक ७ मध्ये ३२७.९० अशी क्वांटीटी पुढील पानावर क्र. ६३ वर घेताना एकूण ३२७९.९० असे नजरचुकीने लिहीले गेल्यामुळे संबंधीत ठेकेदारास या बाबीचे अतिप्रदान रु. ५३,९२५ असे एकूण ५७,९९५ इतके जादा अदाई झालेले आहे. अतिप्रदानाच्या वसुलीबाबत संबंधित ठेकेदारास बांधकाम विभागाकडून कळविण्यात आलेले असून अद्याप सदरची रक्कम वसूल झालेली नाही. तथापि, वसुलीबाबत पाठपुरावा चालू आहे.

(७) सुरक्षा अनामत परतावा रकमेच्या अदाई बाबत वित्त विभागाकडील नोंदवह्यांची पडताळणी करून खातरजमा केली असून दुबार परतफेड झालेचे दिसून आलेले नाही. म्हणून संबंधितांकडून वसुलीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(८) संबंधित मुक्तेदार त्यांना प्राप्त देयकाच्या रकमेच्या अनुषंगाने त्या त्या आर्थिक वर्षात प्राप्तीकराचा भरणा करत असल्याने वसुलीची आवश्यकता नाही.

(९) मुद्रांक शुल्काची रक्कम रुपये १०,५८० इतकी संबंधित ठेकेदारास भरणा करणेबाबत कळविणेत आले असून सदरची रक्कम जमा होताच शासन निधीत भरणा करण्यात येत आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :**

सांगली जिल्हापरिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद, सांगली यांची दिनांक २१ ऑगस्ट २००७ रोजी साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सदर कामासाठी एकच निविदा प्राप्त झाल्याने शासन आदेशानुसार फेरनिविदा मागविण्याची कार्यवाही का करण्यात आली नाही. ज्यावेळी एकच निविदा प्राप्त झालेली असेल अशा वेळी कोणत्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात येतो. त्यावर असा खुलासा करण्यात आला की, सदर कामासाठी एकूण चार निविदांची विक्री झाली होती. त्यापैकी एकच निविदा मेसर्स श्री. नेहरकर कंस्ट्रक्शन यांच्याकडून प्राप्त झाली होती. महाराष्ट्र पब्लिक वर्कस मॅन्युअलमधील नियम क्र. २०८ मधील टीप क्र. २ (बी) नुसार सदरच्या एकमेव निविदेमधील दर वाटाघाटीने कमी करण्याच्या कामी जिल्हा परिषद ठराव क्र. १३५३ अन्वये निर्णय घेण्यात आला होता.

समितीने ग्रामविकास विभागाच्या उपसचिवांना अशा परिस्थितीत निश्चित कायदेशीर तरतूद काय आहे याबाबत खुलासा करण्यास सांगितले. त्यावर त्यांनी असा खुलासा केला की सार्वजनिक बांधकाम विभाग मॅन्युअल मधील नियम २०८ च्या टीप क्रमांक २ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे.----

(अ) जेव्हा जाहीरपणे निविदा मागविण्यात येतात परंतु अगदी किमान निविदाही जादा दरामुळे स्वीकारता येत नाही आणि किमान निविदाकाराबरोबर वाटाघाटी करून त्यांचे दर कमी केले जातात अशी कामे,

(ब) एखाद्या कामाकरीता एकच निविदा सादर केली जाते व वाटाघाटीने तिचे दर कमी केले जातात अशी कामे,

(क) किमान रकमेची निविदा, स्वीकृतीच्या अंतिम टप्प्यावर कोणत्याही कारणामुळे ठराविक मुदतीत सुरक्षा ठेव न भरणे, निविदा दस्तऐवज पूर्ण न करणे इ. कारणांमुळे अग्राह्य ठरली तर ती निविदा निरुपयोगी होते व बयाणा रक्कम जप्त होऊन आपोआप नाकारली जाते आणि स्वीकृतीसाठी खालून दुसऱ्या क्रमांकाची निविदा विचारात घेतली जाते. त्यासाठी निविदा समितीच्या मान्यतेची आवश्यकता नाही.

त्यावर समितीने मुख्य लेखापरिक्षकांना लेखा परिच्छेद का उपस्थित करण्यात आला याबाबत विचारणा केली असता मुख्य लेखा परिक्षक यांनी असा खुलासा केला की, यामध्ये २०८ च्या २ (बी) प्रमाणे जी तरतूद आहे ती सर्वसाधारपणे चढ्या दराने निविदा येतात असे लक्षात येते त्यावेळी

वापरता येते. पहिले काम १९९३ सालापासूनचे आहे. सर्वसाधारण निविदा प्रक्रियेचा नियम असा आहे की कमीत कमी ३ निविदा येऊन स्पर्धा झाली पाहिजे. याठिकाणी ती स्पर्धा झाली नाही. अशी काय परिस्थिती होती की, एकाच निविदेवर निर्णय घ्यायचा होता त्याबाबत लेखा परिच्छेद आलेला आहे. एकच कॉल केला, त्या कॉलवर एकच निविदा प्राप्त झाली आणि ती स्वीकारली गेली.

त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी असा खुलासा केला की, ४ निविदा विकल्या गेल्या होत्या. परंतु, एकच निविदा प्राप्त झाली व ती ९.९९ टक्क्यांपेक्षा जास्त दराची होती. त्यावेळी जिल्हा परिषदेच्या समितीने निर्णय घेतला की, एकच निविदा आलेली आहे त्यावेळेच्या परिस्थितीत त्यांना काम सुरू करायचे होते. एकाच निविदाकाराबरोबर वाटाघाटी करण्यात आल्या आणि तसे करता येते असे सा.बां.विभागाचे म्हणणे आहे. त्यावेळी ९.९९ वरुन १.९९ प्रमाणे काम झाले आहे. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, सदर कामासाठी पुन्हा निविदा काढणे आवश्यक होते. त्यावेळी जर प्रतिसाद मिळाला नाही तरच सा. बां. विभागाच्या मॅन्युअलप्रमाणे अंतिम निर्णय घ्यावयास हवा होता. समितीने पुढे अशी विचारणा केली की, कार्योत्तर मंजुरीसाठी दिनांक २८-३-२००३ रोजी शासनाकडे प्रस्ताव सादर केला असून त्यास अद्याप शासनाकडून मान्यता का मिळाली नाही, त्यावर कोणतेही अभिप्राय देण्यात आले नाहीत. ठेकेदारांना अतिप्रदान करण्यात आले यास कोण जबाबदार आहे अशी विचारणा समितीने केली असता असे सांगण्यात आले की, ज्युनिअर इंजिनिअर श्री.मदने हे सदर अतिप्रदानास जबाबदार आहेत.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.----**

कार्योतर सुधारीत प्रशासकीय मंजुरीसाठी शासनाकडे दिनांक २८-३-२००३ रोजी प्रस्ताव सादर केलेला असताना ४ वर्षे होऊन ही अद्यापपर्यंत प्रशासकीय मान्यता न मिळण्याची कारणे काय आहेत व त्याबाबत सद्य:स्थिती काय आहे.

**यावर जि.प. सांगली यांच्याकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :----**

शासनाचे ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील पत्र क्र. झेडपीए /२००९/प्र.क्र. ४७९/ वित्त ९, दि. १६-२-२००९ अन्वये पूरक माहिती मागविणेत आलेली आहे व त्याप्रमाणे या कार्यालयाने सदरची माहिती जा.क्र. बांध / लेखा / २/१२६६/०९, दिनांक २८-४-२००९ अन्वये सादर केली आहे. याबाबत पाठपुरावा चालू आहे. माहिती मिळताच समितीस सादर करणेत येत आहे.

**सचिवांची साक्ष :**

समितीस प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक २६ जून, २००९ रोजी मंत्रालयीन विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सुधारीत प्रशासकीय मंजुरीसाठी मान्यता दिली आहे काय, असल्यास, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे. त्यावर ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी असा खुलासा केला की, याबबतीत जो निधी भरावयाचा होता तो भरला नव्हता परंतु, नंतर तो जून महिन्याच्या २३ तारखेला भरलेला असून सदर प्रकरणी संबंधितांवर पुढील कारवाई करून १५ दिवसात निर्णय घेवून त्याबाबतची माहिती समितीला कळविण्यात येईल.

**अभिप्राय व शिफारशी :**

सांगली जिल्हापरिषदेने विस्तारीत प्रशासकीय इमारत बांधकामावर एकूण रक्कम रुपये १,०९,२६,५६७ एवढा खर्च केला. सदर कामासाठी एकच निविदा प्राप्त झाली होती. त्यामुळे फेरनिवदा मागविणे आवश्यक होते परंतु तसे न करता मे. नेहरकर कन्स्ट्रक्शन्स, कराड यांना काम देण्यात आले व असे करीत असताना महाराष्ट्र पब्लिक वर्क्स मॅन्युअल मधील नियमाचा आधार घेण्यात आला. **त्यामुळे सर्वसाधारण निविदा प्रक्रियेच्या नियमांचे पालन सदर काम करीत असताना जिल्हापरिषदेकडून झालेले नाही. जिल्हापरिषदेने आपल्या दिनांक १९-१०-९६ रोजीच्या बैठकीत ठराव करून त्यापुढील बैठकीत निविदा जादा दराने मंजूर केली. जिल्हापरिषदेचे संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी त्यावेळी जिल्हापरिषदेच्या समितीसमोर निविदा प्रक्रियेसंदर्भातील नियम काय आहेत. एखादी निविदा स्वीकारताना अथवा ठेकेदाराबरोबर कंत्राट करीत असताना कोणत्या प्रकारची दक्षता घेणे आवश्यक आहे, इत्यादी बाबतची माहिती निदर्शनास आणणे आवश्यक होते. परंतु तसे सदर कंत्राट देत असताना झाल्याचे दिसून येत नाही सबब यापुढे असे कोणतेही कंत्राट देत असताना योग्य पध्दतीचा अवंलब करण्याबाबतची दक्षता संबंधितानी घ्यावी अशी शिफारस समिती करीत आहे.**

जिल्हापरिषदेने विस्तारीत प्रशासकीय इमारतीच्या बांधकामावर एकूण रक्कम रुपये १,२३,२३,००० खर्च केली होती सदर कामासाठी घसारा निधीतून रक्कम रुपये १.२० लाख मंजूर करण्यात आली होती. परंतु, प्रत्यक्षात त्यापेक्षा ३,२३,००० एवढी जास्त रक्कम खर्च करण्यात आली. सदर रकमेस कार्योत्तर मंजुरी मात्र घेण्यात आली नव्हती. जि.प. मार्फत नंतर सदर प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला परंतु त्यास जवळपास चार वर्षाचा कालावधी झाला तरी मान्यता मिळाली नव्हती. समितीने निदर्शनास आणल्यानंतर सदर प्रस्तावास दिनांक २३ जुलै, २००९ च्या पत्रान्वये मान्यता देण्यात आली व जि.प. घसारा निधीतून प्रथम मंजूर करण्यात आलेल्या रुपये ६० लाखापैकी ३ हप्ते व नंतर मंजूर करण्यात आलेल्या रुपये ६० लाखापैकी ६ हप्ते शिल्लक आहेत. ते हप्ते त्यांनी दरवर्षी प्रत्येकी चार लाख रुपये याप्रमाणे घसारा निधीत जमा करावेत, असे निदेश देण्यात आले. **सबब, समिती अशी शिफारस करीत आहे की, भविष्यात अशा प्रकारची अनियमितता**

होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी व त्याअनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांना कठोर शब्दात समज देण्यात यावी. तसेच, कार्योत्तर मान्यता देताना घालण्यात आलेल्या अटीनुसार संपूर्ण रक्कम घसारा निधीत जमा करण्यात आली किंवा कसे याबाबतची संपूर्ण माहिती समितीला पाठविण्यात यावी.

**१.२ सन २००३-२००४ या वर्षात जिल्हापरिषदेमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (कर्ज वसुली थकबाकी) परिच्छेद क्रमांक ३.५६८, सांगली जिल्हापरिषदेच्या कर्ज वसुली थकबाकी** यासंदर्भात लेखा परिक्षकांनी खालील अभिप्राय नमूद केलेले आहेत.----

| अ. क्र. (१) | नियमबाह्य (२) | जिल्हापरिषदेचा विभाग व जिल्हा (३) | ले.प.अहवालातील परि.क्र. (४) | रक्कम रु. (५) |
|---|---|---|---|---|
| १ | कर्ज वसुली थकबाकी | समाजकल्याण, सांगली | ४४ | १४,७३,५७७ |

**उपरोक्त अभिप्रायाच्या अनुषंगाने जिल्हापरिषद, सांगली यांनी खालीलप्रमाणे खुलासा केला आहे :----**

शासनाच्या निधीमधून सन १९५८-५९ पासून वेळोवळी मागासवर्गीयांना लघुद्योग धंद्यासाठी कर्ज, दुमती जनावरे खरेदीसाठी कर्ज, शेती औजारे खरेदीसाठी कर्ज, कोयना भूकंपग्रस्तांना कर्ज वाटप योजना, ओलिताखाली विहीरी खोदणे (नवीन/दुरुस्ती) शेतकऱ्यांना जमीन दुरुस्तीसाठी कर्ज इ. योजनांतर्गत कर्ज देण्यात आलेली आहेत.

कर्जाच्या नोंदवह्या अद्यावत केलेल्या आहेत. संबंधित लाभार्थीला रक्कम वसुलीबाबत कळविणेत आलेले आहे. तसेच लाभार्थीकडूनच रक्कम वसुलीबाबत कार्यवाही चालू आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :**

सांगली जिल्हापरिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, सांगली यांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सदर रकमेची वसुली करण्यात आली आहे काय त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, शासनाच्या निधीमधून सन १९५८-५९ पासुन वेळोवेळी लघु उद्योग धंद्यासाठी मागासवर्गीयांना दुभती जनावरे खरेदीसाठी कर्ज, शेती अवजारे खरेदीसाठी कर्ज, कोयना भूकंपग्रस्तांना कर्ज वाटप योजना, ओलिताखाली विहिरी खोदणे (नवीन व दुरुस्ती), शेतकऱ्यांना जमीन दुरुस्तीसाठी कर्ज इत्यादी कारणासाठी कर्ज देण्यात आली होती. त्यापैकी १००० लोकांच्या प्रकरणांची सविस्तर माहिती सापडली. त्यांना नोटीसा देण्यात आल्या आहेत. त्यांच्याकडून वसुली होईल. तेवढी वसुली करण्यात येईल व इतर लोकांच्या रकमा निर्लेखित करण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्याच्यादृष्टीने विभागाकडून खालील मुद्द्यावर माहिती मागविण्यात आली.**

१४ लाख रुपये निर्लेखित करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे काय, असल्यास त्यासंबंधी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे. अद्याप निर्णय घेण्यात आला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत.

**त्यावर जिल्हापरिषद, सांगली यांच्याकडून पुढील प्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

रक्कम रुपये १४,७३,५७७/- निर्लेखित करण्यासंबंधीचा प्रस्ताव दिनांक २ मे, २००९ रोजी शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावास अद्याप मान्यता मिळालेली नाही.

**सचिवांची साक्ष :**

उपरोक्त माहितीच्या आधारे समितीने दिनांक २६ जून, २००९ रोजी सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली असता त्यांनी सदर प्रकरणाबाबत असा खुलासा केला की, फेज नं.२१ मध्ये रक्कम निर्लेखित करण्यासंबंधीचा प्रस्ताव आला होता. १४ लाखांपैकी फक्त २ लाख रुपये शासनाचे व १२ लाख रुपये जिल्हापरिषदेचे आहेत त्याबाबतची माहिती मागविण्यात येत आहे. माहिती प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसात याबाबतची प्रक्रिया पूर्ण केली जाईल.

**अभिप्राय व शिफारशी :**

सांगली जिल्हापरिषदेनी शासनाच्या निधीतून वेळोवेळी मागासवर्गीयांना लघुउद्योग धंद्यासाठी कर्ज, दुभती जनावरे खरेदीसाठी कर्ज, शेती औजारे खरेदीसाठी कर्ज, कोयना भूकंपग्रस्थांना कर्ज वाटप योजना इत्यादी योजनाअंतर्गत कर्ज दिली परंतु त्यांची वसुली मात्र करण्यात आली नाही. सद्यस्थितीत जवळपास १४,७३,५७७/- कर्ज वसुली बाकी असून जिल्हापरिषदेमार्फत देण्यात आलेल्या कर्जदारांच्या नोंदी देखील अद्यावत ठेवण्यात आलेल्या नाहीत. यावरुन जिल्हापरिषदेच्या कारभारात केवढा गलथानपणा आहे हे दिसून येते. कर्जवसुलीची रक्कम रुपये १४,७३,५७७ निर्लेखित करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक २/५/२००९ रोजी शासनाकडे पाठविण्यात आल्याचे जिल्हापरिषदेमार्फत नंतर कळविण्यात आले आहे. **सदर कर्ज प्रकरणे ही सन १९५८-५९ सालापासूनची आहेत व त्याबाबतचा प्रस्ताव आता पाठविण्यात आलेला आहे. यावरुन जिल्हापरिषद प्रशासन किती कार्यतत्परतेने काम करते हेही दिसून येते. सबब जिल्हा परिषदेच्या अशा प्रकारच्या गलथान कारभाराला जबाबदार असणाऱ्या संबंधितावर योग्य ती कारवाई करावी व त्याबाबतची माहिती समितीला सहा महिन्याच्या आत पाठविण्यात यावी अशी शिफारस समिती करीत आहे.**

तसेच एखाद्या योजने अंतर्गत कर्ज वाटप केल्यानंतर त्याची परतफेड करणे आवश्यक आहे. ही भावना लाभार्थ्यांच्या मनात रुजवणे देखील आवश्यक आहे. परंतु सांगली जिल्हापरिषदेकडील सदर प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, लाभार्थ्यांनी कर्ज घेतली परंतु त्याची परतफेड करण्यात आली नाही. तसेच जिल्हापरिषद प्रशासनाने देखील सदर रक्कम वसुली करण्यासाठी काहीच प्रयत्न केल्याचे दिसून आले नाही. परंतु कर्जाची रक्कम वसुल न झाल्याने सदर रक्कम निर्लेखित करण्यासंबंधीचा प्रस्ताव सादर केला आहे. **सचिवांच्या साक्षीच्या वेळी समाजकल्याण विभागाच्या सचिवांनी सदर प्रकरणी माहिती मागवून घेवून १५ दिवसात समितीला माहिती देतो असे आश्वासित केले होते परंतु अद्यापपर्यंत त्यांच्याकडून त्याबाबतची माहिती प्राप्त झाली नाही. यावरुन समितीसमोर आश्वासित केलेल्या एखाद्या मुद्यास सचिव किती गांभिर्याने घेतात हे दिसून येते.सबब सदर प्रस्तावावर शासनामार्फत काय कार्यवाही करण्यात आली तसेच अशा प्रकारचे निर्लेखनाचे प्रस्ताव भविष्यात प्राप्त झाल्यास शासनाची काय भूमिका असेल याबाबतची माहिती देखील पाठविण्यात यावी अशी शिफारस समिती करीत आहे.**

# प्रकरण दोन

## ठाणे जिल्हा परिषद (लेखा)

### २.१ गणवेश कापड खरेदी सन २००२-२००३ (परिच्छेद क्रमांक ३.४३)

सन २००३-२००४ च्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील (परिच्छेद क्रमांक ६)-- जिल्हा परिषद, ठाणे यांनी इयत्ता १ ली ते ४ थी मधील बिगर आदिवासी योजना, आदिवासी उपयोजना, आदिवासी क्षेत्राबाहेरील, विशेष घटक योजना, बिगर आदिवासी उपयोजना, आदिवासी उपयोजना अंतर्गत मुले व मुली यांचा शालेय गणवेश देण्यासाठी गणवेश खरेदी करण्याकरिता एकूण रक्कम रुपये २०,९४,६५९/- इतका खर्च केला याबाबत मुख्य लेखा परिक्षकांनी खालीलप्रमाणे अभिप्राय नमूद केले.

(१) ग्रामविकास व जलसंधारण विभाग-गणवेश, २००३/प्र. क्र.४०/पंरा. ७(२६), दिनांक २७ मार्च, २००३ मधील तरतुदीनुसार विद्यार्थ्यांना गणवेश दिनांक २० जुलै, २००३ पर्यंत पुरविणे आवश्यक होते.

(२) विद्यार्थ्यांना गणवेश लेखापरिक्षण कालावधी (फेब्रुवारी २००५) पर्यंत देण्यात आलेले नाहीत. सन २००२-२००३ मधील अनुदान सन २००३-२००४ मध्ये खर्च करण्यास ग्रामविकास व जलसंधारण विभागाने परवानगी दिली आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभाग गणवेश २००३/ प्र. क्र. २००/पंरा-७ (२६), दिनांक २८ ऑक्टोबर, २००३ नुसार जिल्हा परिषदांना विद्यार्थ्यांना गणवेश पुरविण्याबाबत वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. परंतु जिल्हा परिषदेने सदर शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही न केल्यामुळे गरीब विद्यार्थ्यांना अद्याप गणवेश प्राप्त झालेले नाहीत. तरी याबाबत खुलासा करावा.

(३) वस्त्रोद्योग महामंडळाने दिनांक ३१ मार्च, २००४ रोजी कापडाचा पुरवठा केलेला असतांना गठीत समितीने कापडाची नमूना तपासणी दिनांक २९ एप्रिल, २००४ रोजी केली आहे. प्राप्त कापडाची नमूना तपासणी विलंबाने केल्याबाबत खुलासा करावा.

(४) वस्त्रोद्योग महामंडळाला २५ टक्के रकमेचे प्रदान कापडाच्या तांत्रिक चाचणी बाबतचा अहवाल समाधानकारक (स्पेसिफिकेशनप्रमाणे) प्राप्त झाल्यानंतर करावयाचे असताना व्ही.जे.टी.आय. यांचा कापड तपासणी अहवाल दिनांक १२ एप्रिल, २००४, दिनांक १२ मे, २००४ रोजी प्राप्त झालेला असताना मार्च, २००४ मध्ये कापड खरेदी बाबत १०० टक्के रक्कम खर्च करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

(५) गणवेश शिलाईचे काम करुन देण्याकरिता कापड प्राप्त होण्याची वाट न पाहता स्पर्धात्मक जाहीर निवीदा मागविण्याची समांतर कार्यवाही करुन शिलाई संस्था निश्चित करणे आवश्यक होते. योग्य ती कार्यवाही वेळीच न केल्यामुळे शिलाई संस्थांना कापड देणे व गणवेश शिऊन घेणे ही कार्यवाही विहित कालावधित झालेली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना वेळेवर गणवेशाचे वाटप झालेले नाहीत. या अनियमिततेबाबत खुलासा करण्यात यावा.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात जिल्हापरिषद ठाणे यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला.**

**(१)** सन २००२-०३ मध्ये दिनांक ६-३-२००३ च्या पत्रान्वये प्राप्त निधी खर्च करण्याकरिता खरेदीबाबतची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करणेसाठी पुरेसा वेळ नव्हता त्यामुळे केवळ यंत्रमाग महामंडळाकडे कापड पुरवठ्याचे दि.३०-०३-०३. रोजी आदेश देण्याची बाब पूर्ण होऊ शकली. त्याच वेळी सन २००२-०३ मधील प्राप्त निधी जिल्हा फंडात ठेवणे बाबत शासनाच्या दि. २९/३/०३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले व ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील दि. १२/३/०४ च्या पत्रान्वये सन २००२-०३ ची जिल्हा निधीत जमा असलेली रक्कम सन २००३-०४ या वित्तीय वर्षात खर्च करण्यास मान्यता दिली. सबब जुलै, २००३ पर्यंत पुरवठा झाला नाही.

**(२)** गणवेश कापड खरेदी व शिलाई प्रक्रिया खालीलप्रमाणे झाली आहे.

ग्राम विकास व जलसंधारण विभागाचा शासन निर्णय दिनांक १५/३/२००३ अन्वये यंत्रमाग महामंडळास कापड पुरवठादार म्हणून निश्चित करण्यात आले. त्यानुसार महामंडळास दिनांक ३०/३/२००३ रोजी पुरवठा आदेश दिले. त्यानुसार कापड पुरवठा दिनांक २९/०५/२००३ रोजी केला. याबाबत शासन निर्णय दिनांक १५/३/२००३ च्या परिशिष्ट-१० अन्वये गठित केलेल्या समितीने दि. ३०-६-२००३ रोजी कापड तपासणी केली गठीत समितीने घेतलेले नमुने दिनांक ०५/०६/२००३ रोजी तपासणीकरिता प्रयोग शाळेत पाठविले. प्रयोग शाळेचा अहवाल ७/६/२००३ रोजी प्राप्त झाला. दरम्यानच्या काळात शिलाई निविदा १३/५/२००३ रोजी दैनिक नवाकाळला प्रसिध्द केली. त्यानुसार १२ निवीदा प्राप्त झाल्या. निवीदा धारकांनी निवीदे सोबत दिलेले गणवेषाचे नमुने आयटीआय अंबरनाथ येथे तपासणी करीता पाठविण्यात आले. तपासणी अहवाल दि. ०४/०६/२००३ रोजी प्राप्त झाला. तपासणीत पात्र ठरलेल्या निविदाधारकांच्या निविदा दिनांक २१/०६/२००३ रोजी उघडण्यात आल्या. त्यामधील चेतना एंटरप्रायझेस, जळगाव यांचे शर्ट पँट शिलाईचे लघुत्तम दर रु ३.३० व चर्मकार महीला मंडळ, औरंगाबाद यांचे स्कर्ट ब्लाऊजचे लघुतम दर रुपये १.४२ प्रती संच मंजूर करण्यात आले. त्या अनुषंगाने शिलाई

संस्थाकडून करारनामा करणे बँक गॅरंटी व तद्नुषंगाने लागणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर चर्मकार महिला मंडळ, औरंगाबाद यांना दिनांक १३/८/२००३ व चेतना एंटरप्रायझेस, जळगाव यांना दिनांक २६/८/२००३ रोजी शिलाईचे आदेश दिले.

चेतना एंटरप्रायझेस, जळगाव यांनी दिनांक १५/१२/२००३ ते दिनांक २३/१२/२००३ व चर्मकार महिला मंडळ यांनी दि.२४/३/२००४ ते दि. २९/३/२००४ या कालावधीत गणवेश पुरवठा गटस्तरावर केला. तथापी, सदरचे गणवेश शासनाचे स्पेसीफीकेशन प्रमाणे नसल्याचे गठीत समितीच्या निदर्शनास आले. तसेच प्रयोगशाळेकडील दिनांक १-६-२००४ च्या अहवालानुसार ही बाब स्पष्ट झाली. त्यानुसार सदर संस्थांना गणवेश बदलून देणेबाबत कळविण्यात आले. तथापी, सदर संस्थांनी गणवेश पुरवठा शासन आदेशातील स्पेसीफीकेशनप्रमाणे व मोजमापाप्रमाणे तसेच पुरवठा आदेशातील संख्येनुसार व विहीत मुदतीत बदलून न दिल्याने सदर संस्थेविरुध्द ठाणे नगर पोलिस स्टेशन येथे दिनांक २२-७-२००४ रोजी फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला. सदर प्रकरण क्रमांक ६९/०५ न्यायप्रविष्ट असून याप्रकरणी फौजदारी गुन्ह्याचा निकाल निश्चित कालावधित लागणार नसल्याने, तसेच कापड ही बाब नाशवंत असल्याने व उंदीर वाळवी यापासून देखील खराब होणार असल्याने शिलाई संस्थेने गटस्तरावर पुरवठा केलेले गणवेश विद्यार्थ्यांना वाटप करण्यास मा. न्यायालयास दिनांक १६-११-२००५ अन्वये वकीलामार्फत विनंती करण्यात आली. व मा. न्यायालयाने दिनांक २७-०९-२००६ अन्वये परवानगी दिल्यानंतर त्या अनुषंगाने १३-१०-२००६ रोजी सदरचे पुरवठा झालेले गणवेश वाटप करणेबाबत गट शिक्षण अधिकारी यांना कळविणेत आले. दि. २९-११-२००६ ते २८-१२-२००६ या कालावधीत वाटप पूर्ण करणेत आले.

**(३)** दि. ३१-०३-०४ अन्वये कापड पुरवठ्यानंतर गठीत समितीने तपासणी दि.२९/४/०४ अन्वये केलेली आहे. शासनाने नियुक्त केलेल्या गठीत समितीमध्ये जिल्हा परिषदेचे दोन अधिकारी व आय.टी.आय. निदेशक (तांत्रिक अधिकारी) यांचा समावेश होता. गठीत समिती मार्फत तपासणी करण्याकरिता सभा लावणे, नमूना पाहणी करणे, इत्यादी कार्यवाहीसाठी विलंब झालेला आहे.

**(४)** सदर मुद्दा सन २००३-०४ मधील गणवेश पुरवठा योजनेसंदर्भात आहे. महामंडळाने पुरवठा आदेश दि.२४/३/२००४ अन्वये १००% पुरवठा दिनांक ३०-३-२००४ रोजी केला. त्यामुळे दिनांक ३१-०३-०४ रोजी प्रत्यक्ष पुरवठा झाल्याने प्रोफॉर्मा इनव्हॉईसवर देयक पारीत करुन खर्च नोंदविला आहे तथापि, संबंधित पुरवठादारास शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनांच्ये गठीत समितीचा अहवाल व प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यावर महामंडळास धनादेश दिनांक २७-५-२००४ रोजी वितरीत करण्यात आला.

(५) कापड पुरवठा आदेश दिनांक ३०-३-२००३ रोजी दिल्यावर प्रत्यक्ष कापड २९-५-२००३ रोजी प्राप्त झाले. तत्पूर्वी दिनांक १३-५-२००३ रोजी दै.नवाकाळ वृत्तपत्रात गणवेश शिलाई करुन देण्याबाबतची निविदा प्रसिध्द करुन समांतर कार्यवाही करण्यात आली आहे. तथापि, संबंधित शिलाई संस्थेने यंत्रमाग महामंडळाने पुरवठा केलेल्या कापडात व शासनाने विहीत केलेल्या मापात बदल केल्यानंतर विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप केले नाही. या प्रकरणी प्रकरण न्यायप्रविष्ट झालेले होते. दरम्यान गणवेश वाटपास २७-०९-२००६ रोजी मा. न्यायालयाची परवानगी मिळाल्यानंतर १३ ऑक्टोबर, ०६ रोजी प्राप्त झालेले गणवेश वाटप करण्याचे आदेश देण्यात आले.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :**

ठाणे जिल्हापरिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद ठाणे यांची दिनांक २३ ऑक्टोबर, २००७ रोजी साक्ष घेतली त्यावेळी समितीने सदर आक्षेपासंदर्भात असे मत व्यक्त केले की, चेतना एंटरप्रायझेस, जळगाव यांनी दिनांक १५-१२-२००३ ते २३-१२-२००३ व चर्मकार महिला मंडळ यांनी २४-३-२००४ ते २९-३-२००४ या कालावधीत गटस्तरावर गणवेश पुरवठा केला. तथापी, सदरचे गणवेश शासनाच्या स्पेसिफीकेशन प्रमाणे नसल्याचे गठीत समितीच्या निदर्शनास आले. तसेच प्रयोगशाळेकडील दिनांक १-६-२००४ च्या अहवालानुसार ही बाब स्पष्ट झाली व सदर संस्थांना गणवेश बदलून देण्याचे कळविण्यात आले. त्यानंतर गणवेश नाकारले गेले व त्यासंदर्भात गुन्हा दाखल करुन न्यायालयात खटला दाखल केला. सदर प्रकरणाबाबत जिल्हापरिषद न्यायालयात गेल्याने समितीला आश्चर्य वाटते. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, जिल्हा परिषद, ठाणे यांनी इयत्ता १ ली ते ४ मधील बिगर आदिवासी योजना, आदिवासी उपयोजना, आदिवासी क्षेत्राबाहेरील विशेष घटक योजना, बिगर आदिवासी उपयोजना या योजने अंतर्गत मुले व मुली यांना शालेय गणवेश देण्यासाठी, गणवेश खरेदी करण्याकरिता रुपये २०,९४,६५९ इतका खर्च केला होता. गणवेश शिलाईसाठी कापड योग्य दर्जाचे प्राप्त झाले होते परंतु गणवेश शिलाईसाठी ज्या संस्थेला शिलाईचे काम दिले होते त्यांनी योग्य प्रकारे शिलाई केली नव्हती त्यामुळे वाद निर्माण झाला होता. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, सदर गुन्हा कधी दाखल करण्यात आला होता. त्यावर असे सांगण्यात आले की, सदर गुन्हा २२ जुलै, २००७ रोजी दाखल करण्यात आला होता.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, संस्थेने या गणवेशाची शिलाई योग्य केली नाही म्हणून पहिल्यांदा गणवेश नाकारुन संस्थेवर आपण गुन्हा दाखल केला व नंतर त्याच गणवेशाचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. जर सन २००३-२००४ मध्ये हे गणवेश विद्यार्थ्यांना मोठे होत होते तर सन २००५-२००६ मध्ये हे गणवेश विद्यार्थ्यांना बरोबर कसे काय झाले त्यावर कोणतेही

अभिप्राय संबंधित अधिकाऱ्यांनी दिले नाहीत परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे सांगितले की, सदर गणवेश सदोष असल्याने पुन्हा नव्याने गणवेशाची शिलाई करुन द्यावी अशी मागणी करण्यात आली होती परंतु सदर संस्थेने मागणी अमान्य केली. समितीने पुढे अशी विचारणा केली की, सदर प्रकरणाबाबत वकीलांचे काय मत होते त्यावर असे सांगण्यात आले की, याप्रकरणी फौजदारी गुन्ह्यांचा निकाल निश्चित कालावधित लागणार नसून कापड हे नाशवंत असून उंदीर व वाळवी यापासून देखील गणवेश खराब होऊ शकते असे मत, वकीलाने व्यक्त केलेले आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, या गणवेषांची रक्कम अदा करण्यात आली आहे काय, असल्यास ती कोणत्या दराने केली त्यावर असे सांगण्यात आले की, यासाठी अग्रीम दिलेला आहे. त्यात चेतना इंडस्ट्रीज यांना ६२४७१/- आणि चर्मकार महिला मंडळ यांना २६७७९/- एवढा अग्रीम दिला आहे. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, त्यांनी वेळेत गणवेश दिले नाहीत म्हणून त्यांना दिलेले अग्रीमाचे पैसे परत करण्यासाठी विहीत कार्यपध्दतीप्रमाणे नोटीस देणे आवश्यक होते त्याप्रमाणे कार्यवाही करण्याची जबाबदारी कोणाची होती त्यावर असा खुलासा करण्यात आला की, विभाग प्रमुख म्हणून शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी ही कारवाई करणे आवश्यक होते. तशी कारवाई केली असती तर आज ही परिस्थिती निर्माण झाली नसती असे सांगून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे सांगितले की, यासबंधीची चौकशी करुन कारवाई करण्यात येईल व त्याबाबतचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करण्यात येईल.

**सचिवांची साक्ष :-** समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या आधारे समितीने सचिव शालेय शिक्षण व ग्रामविकास विभाग यांची साक्ष घेतली. साक्षीदरम्यान समितीने अशी विचारणा केली की, तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याविरुध्द विभागीय चौकशी करण्याबाबतचा प्रस्ताव शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे दि. ९ मे, २००८ रोजी पाठविलेला असताना देखील त्यांच्याविरुध्द दि. २५ मार्च, २०१० च्या पत्रान्वये चौकशीची कारवाई करण्यात आली आहे यावरुन असे दिसून येते की, सदर कारवाईसाठी दोन वर्षाचा कालावधी लागला आहे यांचे कारण काय आहे. तसेच कोणाच्या विरोधात पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला यावर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, चौकशीची कारवाई करण्याचा प्रस्ताव दिनांक ९ मे, २००८ रोजी पाठविला होता. गणवेष वाटपाच्या योजनेत शासनाकडून कापड देण्यात आले व शिलाईसाठी शासन स्तरावर टेंडर काढून चर्मकार महिला मंडळ औरंगाबाद आणि चेतना इंटरप्रायझेस जळगांव या दोन एजन्सी निश्चित केल्या होत्या त्यानुसार जिल्हा

परिषदेला पुरविण्यात आलेले कापड या दोन एजन्सीला गणवेष शिवून देण्यासाठी दिले व मोजमापाप्रमाणे गणवेष शिवून तालुका स्तरावर पुरवठा करण्याबाबत त्यांना सांगण्यात आले. परंतु पुरवठादार एजन्सीने त्यांना देण्यात आलेल्या कापडात बदल करुन निकृष्ट दर्जाच्या कपड्याचे गणवेश शिवून दिले. याबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने पाहणी केल्यानंतर सदर कापड निकृष्ट दर्जाचे आढळून आले म्हणून दोन्ही एजन्सीज विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, शिलाईचे बिल दिले गेले का जे कापड दिले होते ते रिकव्हर झाले काय त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, सदर संस्थांना बिल देण्यात आले नाही परंतु दीड ते दोन लाख रुपये अग्रीम देण्यात आलेला होता. त्यांना देण्यात आलेले कापड रिकव्हर झालेले नाही.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, गुन्हा केव्हा दाखल करण्यांत आला तसेच सदर प्रकरणी पोलीसांनी कापड जप्त करुन कोर्टात सादर केले का यावर समितीला समाधानकारक उत्तर देता न आल्याने समितीने तत्कालीन पोलीस अधिकाऱ्यांना साक्षीला बोलावून त्यांच्याकडून या प्रकरणाबाबतची माहिती घेण्याच्या निर्णय घेतला. विभाग प्रमुख म्हणून शिक्षणाधिकारी प्राथमिक यांच्यावर शिक्षण संचालक प्राथमिक यांनी देखील तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटला तरी कारवाई का केली नाही. याबाबत समितीला समाधानकारक उत्तरे मिळू न शकल्याने समितीने शिक्षण संचालक यांना देखील साक्षीला बोलवून त्याबाबतची माहिती घेण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार दिनांक १२ मे, २०१० रोजी तत्कालीन संबंधिताची अधिकाऱ्यांची साक्ष घेण्यात आली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, श्री.चंद्रकांत कांबळे, यांनी फिर्यादीनी दि.२२-७-२००४ रोजी जिल्हा परिषद शाळेतील गणवेश कापड खरेदी संदर्भातील तक्रार दाखल केली होती व त्यानुसार चेतना एन्टरप्रायझेस, जळगांव व चर्मकार महिला मंडळ, औरंगाबाद या संस्थांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला व दोन्ही संस्थांच्या संबंधिताना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केली आहेत. समितीने तपासामध्ये काय निष्पन्न झाले. याबाबतची विचारणा केली असता तत्कालीन पोलीस अधिकारी यांनी असे सांगितले की, रेकॉर्डप्रमाणे महामंडळाने दिलेले कापड संस्थेने ताब्यात घेतले होते. परंतु गणवेषासाठी वापरण्यात आलेले कापड दुसरेच होते. त्यामुळे सदर व्यवहारात अपहार झाल्याचे निदर्शनास आल्यामुळे त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. मुळ कापड हस्तगत करण्याचा प्रयत्न करण्यात आला परंतु ठेकेदार कापड बदलण्यात आले नाही याच म्हणण्यावर कायम राहिले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, दुसऱ्या कापडापासून शिवण्यात आलेले गणवेश आपण मुलांना कसे काय वाटले त्यावर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, गणवेष खराब होत असल्यामुळे त्यांचे व्हॅल्यूएशन करुन त्यातील डिफरन्स ठेकेदारांकडून वसूल करण्यात यावा व गणवेष मुलांना वाटप करण्यात यावेत. या मतास न्यायालयाने मान्यता दिल्यानंतर त्याचे वाटप करण्यात आले. समितीने अशी विचारणा केली की, तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याविरुध्द विभागीय चौकशी करण्याबाबत शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात येवूनही सदर प्रकरण ३ वर्षापासून प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत यावर सचिव शालेय शिक्षण यांनी असा खुलासा केला की, या संदर्भात सविस्तर चौकशी करण्यात आली असून त्यांच्याकडे जिल्हा परिषदेचा प्रस्ताव गेला होता परंतु संचालक स्तरावर कारवाई करण्यास दिरंगाई झाल्याचे त्यांनी मान्य केले व संबंधितांवर एक महिन्याच्या कालावधीत कारवाई करण्यात येईल असे सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी -**

ठाणे जिल्हापरिषदेने इयत्ता १ ली ते ४ थी मधील बिगर आदिवासी योजना, आदिवासी उपयोजना, आदिवासी क्षेत्राबाहेरील, विशेष घटक योजना, बिगर आदिवासी उपयोजना, आदिवासी उपयोजना अंतर्गत मुले व मुली यांना शालेय गणवेश देण्यासाठी गणवेश खरेदी करण्याकरिता एकूण रक्कम रुपये २०,९४,६५९ इतका खर्च केला यासंर्दभात प्राप्त झालेल्या उपरोक्त माहिती वरुन असे दिसून येते की, सदर योजनेंतर्गत जिल्हा परिषदेला सन २००२-२००३ साठी प्राप्त झालेले अनुदान सन २००३-२००४ या आर्थिक वर्षात खर्च करण्यास शासनाने परवानगी दिली होती त्यानुसार गणवेश शिलाईच्या निविदा काढण्यात आल्या व चेतना इंटरप्रायजेस, जळगाव यांना शर्ट व पॅंट तसेच चर्मकार महिला मंडळ, औरंगाबाद यांना स्कर्ट व ब्लाऊज शिवुन देण्याबाबतचे आदेश दिनांक २६ ऑगस्ट, २००३ रोजी देण्यात आले आहे. सदर संस्थाना दिनांक १५ ते २३ डिसेंबर, २००३ व २४ ते २९ मार्च, २००४ या कालावधित गणवेशांचा पुरवठा गट स्तरावर केला पंरतु शिलाई संस्थांनी पुरविलेले गणवेश हे शासनाने विहीत केलेल्या नमुन्या (स्पेसिफिकेशनप्रमाणे) प्रमाणे नव्हते तसेच सदर गणवेश हे जिल्हा परिषदने पुरवठा केलेल्या कापडामधुन शिलाई केली नसल्याचे निदर्शनास आल्याने दोन्ही पुरवठाधारक संस्थांवर गुन्हा दाखल करण्यात आला व पुढे सदर, बाब न्यायप्रविष्ठ असल्याने त्याबाबतचा निर्णय निश्चित कालावधीत लागणार नसल्याने तसेच कापड ही बाब नाशवंत असल्याने न्यायालयाच्या दिनांक २९ सप्टेंबर, २०१० रोजी दिलेल्या परवानगीने गणवेशाचे वाटप दिनांक २९ नोव्हेंबर, ते २८ डिसेंबर, २००६ या कालावधीत करण्यात आले. शासनाने निश्चित केलेल्या वाटपाच्या वेळापत्रकानुसार सदर गणवेश **हे दिनांक २० जुलै, २००३ पर्यंत पुरवणे आवश्यक होते. परंतु सदर वेळेचे पालन जिल्हा परिषदेकडून**

करण्यात आले नाही. यावरुन सदर योजनेच्या अंमलबजावणीच्या विविध स्तरावर अनियमितता झाल्याचे दिसून आले व त्यामुळे सन २००३-२००४ या आर्थिक वर्षात गरजू विद्यार्थी सदर योजनेच्या लाभापासून वंचित राहिले. शासनाच्या योजनेला अशाप्रकारे जिल्हा परिषदेमार्फत प्रतिसाद मिळाल्याने शासनाचा सदर योजनेमागील उद्देश सफल होवू शकला नाही याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते.

• शिलाई संस्थांनी जे गणवेश गटस्तरावर पुरवठा केलेले होते ते जिल्हापरिषदेमार्फत पुरविण्यात आलेल्या कापडाचे नव्हते तसेच शासनाने ठरवून दिलेल्या नमुन्याप्रमाणे (स्पेसिफिकेशन) देखील नव्हते. सदर संस्थांना गणवेष बदलून देण्याबाबत विनंती करुनही त्यांची दखल सदर संस्थांनी घेतली नाही. **त्यामुळे जि.प.मार्फत पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली. या सर्व प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर संस्थांना गणवेष शिवून देण्याचे कंत्राट देताना त्याच्याबाबतची विश्वासहर्ता लक्षात घेवून किंवा कागदोपत्री करार करुन त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करता आली असती परंतु सदर कंत्राट देताना जिल्हापरिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यामार्फत अक्षम्य दुर्लक्ष करण्यात आल्यामुळे ही वेळ आली समितीच्या जिल्हापरिषद ठाणे येथे झालेल्या बैठकीत आश्वासित केल्याप्रमाणे तत्कालीन शिक्षण अधिकारी यांच्याविरुध्द कार्यवाही करण्याचा प्रस्ताव शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे पाठविण्यात आला परंतु त्यांच्यास्तरावर देखील सदर प्रकरणी कारवाई करण्यास विलंब झाल्याचे सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी साक्षीदरम्यान मान्य केले यावरुन सदर प्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्यास फारच विलंब लागल्याचे दिसून येत आहे. वास्तविकता या प्रकरणात दोषी असलेल्या संबंधितांवर त्वरीत कार्यवाही होणे अपेक्षित होते परंतु त्यांच्यावर कारवाईचे प्रस्ताव सादर करण्याव्यतिरिक्त कोणतीच कारवाई करण्यात न आल्याने समितीला खेद वाटतो. सबब गणवेषाचे वाटप शासनाने ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार करणे आवश्यक असताना तसे करण्यात आले नाही यास जबाबदार असणाऱ्यांवर तसेच कारवाई करण्यास विलंब करणाऱ्या संबंधितांवर देखील त्वरीत कारवाई करण्यात यावी व तसेच सदर प्रकरणात न्यायालयाने काय निर्णय दिला या प्रकरणी माहिती समितीला सहा महिन्याच्या आत पाठविण्यात यावी अशी शिफारस समिती करीत आहे.**

**२.२ सन २००३-०४ या वर्षात जिल्हापरिषदांमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी**

**(परिच्छेद क्रमांक ३.५६८)** :--सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत- ग्रामपंचायत विभागाकडील अपहार प्रकरणांबाबत मुख्य लेखा परिक्षकांनी खालीलप्रमाणे अभिप्राय नमूद केले आहेत.

(अ) ग्रामपंचायत विभागाने ठेवलेली अपहार प्रकरणांची नोंदवही तपासली असता दिनांक ३१.०३.२००४ अखेर एकूण ४५९ प्रकरणे प्रलंबित असून त्यामध्ये एकूण रक्कम रुपये १,७८,७०,५१६ इतकी गुंतलेली आहे. सन २००३-२००४ या वित्तीय वर्षात उपमुख्य लेखा परिक्षक यांनी २७ अपहाराची प्रकरणे व त्यात गुंतलेली रक्कम रुपये ५६,४२,७९३.१३ प्रकरणे जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात आलेली आहेत.

जिल्हा परिषदेने सन २००३-२००४ मध्ये ९ प्रकरणे निकाली काढून त्यामधील गुंतलेली रक्कम रुपये ४८,६१९ वसूल केले आहेत. उपरोक्त प्रलंबित प्रकरणांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर ग्रामनिधीच्या रकमा अडकून पडलेल्या आहेत व प्रकरणे निकाली काढण्याचे प्रमाण अत्यल्प असल्यामुळे याबाबत ठोस कार्यवाही करुन प्रकरणे त्वरीत निकाली काढून अनुपालन लेखापरिक्षणास दाखवावे.

(ब) सन २००३-२००४ मध्ये एकूण ४५९ प्रलंबित प्रकरणांपैकी ९ प्रकरणे निकाली काढलेली आहेत. परंतु अपहार प्रकरणांतील संबंधितांवर कोणतीही दंडात्मक किंवा ठोस कारवाई करण्यात आल्याचे दिसून येत नाही. केवळ संबंधितांना समज देऊन सेवा पुस्तकात नोंद घेण्यात आल्याचे दिसून येते. याबाबत खुलासा होणे आवश्यक असून त्यांविरुध्द अपहाराच्या स्वरुपानुसार कडक कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे.

(क) ग्रामपंचायतीच्या एकूण ४५९ अपहार प्रकरणांमधील संबंधित ग्रामसेवक सेवानिवृत्त झालेले असतील व त्यांचेवर आजतागायत अपहार प्रकरणे प्रलंबित आहेत व ज्यांना संपूर्ण सेवानिवृत्ती वेतन देण्यात येत आहे अशा ग्राम सेवकांची यादी लेखापरिक्षकास सादर करण्यात यावी व अशी प्रकरणे असल्यास त्यांना पूर्ण निवृत्ती वेतन कोणत्या आधारे देण्यात आले याची खात्री लेखापरिक्षणास देण्यात यावी.

(ड) जवाहर रोजगार निधी अपहाराची नोंदवही तपासता सन २००३-२००४ अखेर ३३५ थकीत प्रकरणांमध्ये एकूण रुपये ३,७४,००,०१३.८२ गुंतलेले असल्याचे दिसून येते. सन २००३-२००४ मध्ये केवळ ११ अपहार प्रकरणांची रक्कम रुपये २,५२,८६९.८५ निकाली

काढलेले आहेत. सदरचे प्रमाण अत्यल्प असून अद्याप ३२४ प्रकरणे प्रलंबित असून त्यामधील गुंतलेली रक्कम रुपये ३,७१,४४,१४३.९७ वसूल होणे बाकी आहे. तरी याबाबत ठोस कार्यवाही करुन प्रकरणे त्वरीत निकाली काढण्यात यावी व तसे अनुपालन लेखापरिक्षणास सादर करावे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात जिल्हापरिषद, ठाणे यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा प्राप्त झाला आहे.--**

**(अ)** सन २००३-२००४ अखेरीस ४५० प्रकरणांपैकी ३२ प्रकरणे निकाली काढली आहेत. यात रक्कम रुपये ११,३०,२३७.१९ एवढी रक्कम वसूल करण्यात आली असून रक्कम रु. १८,२७,६४४.५९ समायोजीत करण्यात आली आहे. अद्याप ४१८ प्रकरणांत रक्कम रु.१,४८,६४,०१५.५२ एवढी रक्कम वसुलीची कार्यवाही चालू आहे.

**(ब)** निकाली काढलेल्या ९ प्रकरणांबाबत तपासणी करुन आवश्यकतेनुसार कार्यवाही करणेत येत आहे.

**(क)** एकूण ४१८ थकीत प्रकरणामधील जे कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत अशा कर्मचाऱ्यांची यादी तयार करुन आवश्यक ती कार्यवाही करणेत येत आहे.

**(ड)** सन २००३-०४ अखेरच्या ३२४ प्रकरणांतील ३० प्रकरणे निकाली काढली आहेत. त्यात रक्कम रु. ३,९३,०४१.९० वसूल करणेत आली आहे व रक्कम रु. ६७,३६,८९७.४४ रक्कम मुल्यांकने व प्रमाणकाद्वारे समायोजीत केलेली आहे. उर्वरित २९४ प्रकरणांबाबत कार्यवाही चालू आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :**

ठाणे जिल्हापरिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद, ठाणे यांची दिनांक २३ ऑक्टोबर, २००७ रोजी साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला अशी माहिती दिली की, एकूण ५७२ प्रकरणे अपहाराची असून १९ प्रकरणे निकाली काढली व ४१८ प्रकरणात ९.५० लाखाची वसुली करण्यात आली असून ही वसुली सन १९६८ पासूनची असून त्यातील ४ प्रकरणांची खातेनिहाय चौकशी सुरु आहे. २८ प्रकरणामध्ये पोलीस केसेस दाखल करण्यात आल्या असून ६ लोकांना निलंबित करण्यात आले आहे व ५ लोकांना सेवेतून बडतर्फ केले आहे. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, ४१८ प्रकरणांची संपूर्ण माहिती समितीला देण्यात यावी

त्यावर समितीला असे सांगण्यात आले की, यामध्ये १० केसेसमधील लोक मयत झाले. १५ प्रकरणांच्या बाबतीत न्यायालयात केसेस सुरु आहेत. २८ प्रकरणांमध्ये विभागीय चौकशी सुरु असून पोलिसात केसेस दाखल करण्यात आल्या आहेत. १८ प्रकरणांमध्ये वेतनवाढी बंद करण्यात आल्या आणि ६ लोकांना निलंबित करण्यात आले आहे. ५ लोकांना सेवेतून कमी केले आहे व ३२६ लोक सध्या कार्यरत आहेत. त्यांच्याकडून वसुलीची कारवाई चालू आहे. या ३२६ कर्मचाऱ्यांकडून १ कोटी ३९ लाख एवढी रक्कम वसूल होणे बाकी आहे व सदर वसुलीची कार्यवाही सुरु आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेने केलेल्या कारवाईच्या विरोधात जे कर्मचारी न्यायालयात गेले त्यापैकी किती प्रकरणांमध्ये स्थगिती मिळाली. त्यावर याबाबतची माहिती समितीला नंतर सादर करण्यात येईल असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले व गटनिहाय प्रकरणांची पुढीलप्रमाणे माहिती समितीस सांगितली. गटनिहाय पालघरची ८८ प्रकरणे असून त्यातील रक्कम २९.४८ लाख, डहाणू पंचायत समितीची ३५ प्रकरणे असून १४.६२ लाख एवढी रक्कम आहे. भिवंडीची ९० प्रकरणे असून ५०.५६ लाख एवढी अपहाराची रक्कम आहे. अंबरनाथची १८ प्रकरणे असून ९०३००/- एवढी अपहारित रक्कम आहे. वसईच्या २४ प्रकरणांमध्ये १०.०५ लाख एवढी रक्कम आहे. वाड्याच्या १० प्रकरणांमध्ये १९,६५६/- एवढी रक्कम आहे. शहापूरच्या ५१ प्रकरणांमध्ये २,१५,२९४/- इतकी रक्कम मोखाडा येथील १८ प्रकरणी १,०६,२७२/- एवढी रक्कम गुंतलेली आहे, तलासरीच्या ३ प्रकरणांमध्ये ५९,५६३/- एवढी रक्कम असून मुरबाडच्या २१ प्रकरणी २,२५,८९२/- एवढी रक्कम आहे. जव्हार तालुक्यातील ११ प्रकरणांमध्ये ८८,६५६/- रु., कल्याण तालुक्यातील ११ प्रकरणांमध्ये १,५१,३५७/- रु., विक्रमगड तालुक्यातील ७ प्रकरणांमध्ये १२,४७३/- रु. तसेच ठाणे तालुक्यातील २८ प्रकरणांमध्ये २,८४,३३३/- रु. रक्कम गुंतलेली असून, न्यायालयातील प्रकरणांमध्ये ४४,१८७ रुपये गुंतलेले आहेत.

त्यावर समितीने सदर प्रकरणे न्यायालयात केंव्हापासून आहेत अशी विचारणा केली असता ती सन १९६९ ते १९९१ या कालावधीतील प्रकरणे आहेत असे सांगण्यात आले. समितीने पुढे अशी विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी तालुकानिहाय अपहारीत प्रकरणांची संख्या व त्यामध्ये गुंतलेली रक्कम सांगितली आहे. १९७२ पासून ज्यांची विभागीय चौकशी सुरु आहे. त्याबाबतची माहिती देण्यात यावी. त्यावर गट विकास अधिकारी डहाणू यांनी असा खुलासा केला की, डहाणू पंचायत समितीमध्ये नियमबाह्य घडलेली ३६ प्रकरणे असून त्यापैकी ६ प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. तसेच ६ प्रकरणे निकाली निघालेली असून, त्यामध्ये गुंतलेली ३१,०७६.०९ रुपये वसूल झाले आहेत. वसुलीच्या पावत्या देखील उपलब्ध आहेत. सदरहु ६ प्रकरणांत ९ ग्रामसेवक गुंतलेले होते. त्यांच्याकडून सदरहु रकमेची वसुली झालेली आहे.

समितीने पुढे पालघर तालुक्यातील स्थितीबाबत विचारणा केली असता गट विकास अधिकारी, पालघर यांनी असा खुलासा केला की, पालघर पंचायत समितीअंतर्गत २ प्रकरणे असून, त्यामध्ये १९,८३२ रुपयांचा अपहार झालेला आहे. सदरहु प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. या प्रकरणामध्ये ७ ग्रामसेवक आणि १ सरपंच गुंतलेले आहेत. त्यावर समितीने न्यायप्रविष्ट असलेली प्रकरणे सध्या कोणत्या स्टेजला आहेत याबाबतची माहिती विचारली असता सन १९८४ ला केस दाखल केली होती. ही केस अजूनही सुरुच आहे असे सांगण्यात आले.

, त्यावर समितीने असे निर्देश दिले की, या संपूर्ण प्रकरणी १ कोटी ३९ लाख रुपयांचा गैरव्यवहार झालेला आहे. त्यामुळे अतिरिक्त मु.का.अ. यांनी ३ महिन्यांत या संपूर्ण प्रकरणांची चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल समितीला सादर करावा.

समितीने पुढे जवाहर रोजगार निधीच्या अपहाराच्या ३३५ थकित प्रकरणांची तालुकानिहाय सद्य:स्थिती काय आहे याबाबत विचारणा केली असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, सन २००३-२००४ अखेरच्या ३२४ प्रकरणांतील ३० प्रकरणे निकाली काढली असून त्यात रक्कम रु.३,९३,०४१.९० वसूल करण्यात आलेले आहेत. तसेच रक्कम रु.६७,३६,८९७.४४ मुल्यांकने व प्रमाणकाद्वारे समायोजित केलेली आहेत. उर्वरित २९४ प्रकरणांबाबत कार्यवाही सुरु असून पालघर तालुक्यातील ३५ प्रकरणे असून ही प्रकरणे १९९५ मधील आहेत. यामध्ये ३३.८३ लक्ष रुपये रक्कम आहे. डहाणू तालुक्यातील १७ प्रकरणे असून ही प्रकरणे १९८९-९० मधील असून यामध्ये ३५,६२,२८४ रुपये रक्कम आहे. भिवंडी तालुक्यातील ५० प्रकरणे असून ही प्रकरणे १९८९-९० मधील आहेत. यामध्ये ५७,४७,७२९ रुपये रक्कम आहे. अंबरनाथ तालुक्यातील १५ प्रकरणे असून ही प्रकरणे १९८९-९० मधील आहेत. यामध्ये २१,१९,७६८ रुपये रक्कम आहे. वसई तालुक्यातील ८ प्रकरणे असून ही प्रकरणे १९८९-९० मधील आहेत. यामध्ये ६,२९,४६८ रुपये रक्कम आहे. वाडा तालुक्यातील १३ प्रकरणे असून यामध्ये २१,१६,३५५ रुपये रक्कम आहे. शहापूर तालुक्यातील ६८ प्रकरणे असून ही प्रकरणे १९८९-९० मधील आहेत. यामध्ये ६९,६०,५९० रुपये रक्कम आहे. मोखाडा तालुक्यातील ३ प्रकरणे असून ही प्रकरणे १९८९-९० मधील आहेत. यामध्ये २,११,४३९ रुपये रक्कम आहे. तलासरी तालुक्यातील २ प्रकरणे असून यामध्ये १,०१,३६० रुपये रक्कम आहे. मुरबाड तालुक्यातील ४८ प्रकरणे असून ही प्रकरणे १९८९-९० मधील आहेत. यामध्ये २४,७२,०३५ रुपये रक्कम आहे. जवाहर तालुक्यातील १४ प्रकरणे असून ही प्रकरणे १९८९-९० मधील आहेत. यामध्ये १६,१९,१६६ रुपये रक्कम आहे. कल्याण तालुक्यातील १४ प्रकरणे असून ही प्रकरणे १९९३-९४ मधील आहेत. यामध्ये ८,३८,०९५ रुपये रक्कम आहे. विक्रमगड तालुक्यातील ७ प्रकरणे असून यामध्ये ३,०८,९०५ रुपये रक्कम आहे. अशी एकुण २९४ अपहाराच्या प्रकरणांची स्थिती आहे. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, अपहाराचे पैसे वसूल करण्याच्या संदर्भात आपण काही प्रयत्न केलेले आहेत काय. त्यावर असे

सांगण्यात आले की, अपहाराच्या रक्कमा वसूल करण्याच्या संदर्भात गट विकास अधिकाऱ्यांच्या अंतर्गत स्वतंत्र कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे त्यांच्यावर वसुलीची कारवाई सुरु आहे. येत्या तीन महिन्यात जवाहर रोजगार निधी अपहाराचे काम पूर्ण होईल. सन २००७ मध्ये ग्रामनिधीचे एकदंर ५६७ प्रकरणे असून यामध्ये ६,८७,५५,८४२ रुपयांचा अपहार झालेला असून यामध्ये एकंदर ४.१६ कोटी रुपये वसूल करण्यात आलेले आहेत. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, ठाणे जिल्ह्यात अपहाराचे, समायोजनाचे प्रकार फार मोठ्या प्रमाणात वाढलेले दिसते. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे सांगितले की, गेल्या ३-४ वर्षापूर्वी यासंदर्भात लक्ष दिले जात नव्हते. त्यावर समितीने असे निदेश दिले की, या प्रकरणाच्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संपूर्ण चौकशी करावी. त्याबाबतचा परिपूर्ण अहवाल समितीला देण्यात यावा.

**उपरोक्त माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने विभागाकडून खालील मुद्यांबाबत माहिती मागविली.----**

१. रकमेचा अपहार करणाऱ्या दोषी व्यक्तींवर ठोस किंवा दंडात्मक स्वरुपाची काय कारवाई करण्यात आली वा येत आहे याबाबतची पंचायत समिती निहाय माहिती देण्यात यावी.

२. तसेच प्रलंबित अपहारीत रक्कम प्रकरण निहाय वसूल करण्यात आली आहे काय, असल्यास किती रक्कम वसूल करण्याचे बाकी आहे व त्याची कारणे काय आहेत प्रलंबित अपहारीत रक्कम वसूल करण्याबाबत कोणती ठोस उपाययोजना करण्यात आली आहे. याची सविस्तर माहिती देण्यात यावी.

३. तसेच ठाणे जिल्हा परिषदेमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात अपहाराची प्रकरणे निर्माण होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**जिल्हा परिषद, ठाणे यांच्याकडून उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने खालील माहिती प्राप्त झाली.---**

१. जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत ग्राम पंचायत विभागाकडील अपहार प्रलंबित प्रकरणे व त्यानंतरच्या निकाली अपहार प्रकरणांची सद्य:स्थिती पुढीलप्रमाणे आहे :---

| तालुका | ग्रामनिधी | | | जवाहर रोजगार योजना | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | प्रकरणे संख्या | निकाली | शिल्लक | प्रकरणे संख्या | निकाली | शिल्लक |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| तलासरी | ३ | ३ | ० | ३ | ३ | ० |
| कल्याण | १५ | १५ | ० | २८ | २५ | ३ |
| विक्रमगड | ९ | ९ | ० | ११ | ९ | २ |

**प्रलंबीत प्रकरणांची सद्य:स्थिती.----चालू**

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| वसई | ३४ | २८ | ६ | १५ | १३ | २ |
| अंबरनाथ | २८ | २२ | ६ | ३२ | २८ | ४ |
| मोखाडा | १९ | १३ | ६ | ८ | ६ | २ |
| वाडा | २३ | १६ | ७ | ३६ | २८ | ८ |
| डहाणू | ४२ | ३० | १२ | ३७ | २२ | १५ |
| जव्हार | ३३ | १६ | १७ | ४२ | २६ | १६ |
| ठाणे | २० | ० | २० | ० | ० | ० |
| मुरबाड | ४६ | २५ | २१ | ९४ | २७ | ६७ |
| शहापूर | ७५ | २१ | ५४ | ११४ | १७ | ९७ |
| पालघर | १०६ | ५० | ५६ | ५२ | २८ | २४ |
| भिवंडी | १२२ | ५० | ७२ | ८२ | ३३ | ४९ |
| **एकूण** | **५७५** | **२९८** | **२८८** | **५५४** | **२६५** | **२८९** |

वरील तपशिलानुसार पंचायत राज समिती भेटीनंतर प्रलंबित प्रकरणे निकाली काढल्याची टक्केवारी ग्रामनिधी ५२% व रोजगार योजना ४८% एवढी आहे.

एकूण ९६८ ग्रामपंचयातीपैकी जवाहर रोजगार योजना व ग्रामनिधी अंतर्गत झालेल्या अपहार प्रकरणी संबंधित दोषींवर केलेल्या कार्यवाहीचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.---

(अ) १० ग्रामसेवकांना बडतर्फ करण्यात आले आहे.

(ब) ११ ग्रामसेवकांना निलंबित करण्यात आले आहे.

(क) १४ ग्रामसेवकांच्या वेतनवाढी बंद करणेत आल्या आहेत.

(ड) २२ ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी यांचेवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(इ) ४ ग्रामसेवक यांचेवर विभागीय चौकशी सुरु आहे.

(फ) १५ प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत.

२. प्रलंबित अपहारित रक्कम प्रकरणनिहाय वसूल करण्यात आली असून त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे :---

| योजना<br>(१) | अपहार प्रकरणे<br>(२) | गुंतलेली रक्कम<br>(३) | समायोजीत वसुल रक्कम<br>(४) | प्रलंबित रक्कम<br>(५) |
|---|---|---|---|---|
| | | रु. | | रु. |
| ग्रामनिधी | ५७५ | ७०२४८८४९ | ५४७५१३५० | १५४९७४९८ |
| ज.रो.यो. | ५५४ | ६८७७७००० | ३५१६७३१७ | ३३६०९६८२ |

पंचायत राज समितीच्या भेटीच्या नंतर प्रलंबित अपहार प्रकरणी जिल्हा परिषदेने विशेष धडक मोहिम हाती घेऊन अपहारात गुंतलेल्या रकमेपैकी समायोजन व वसुलीची टक्केवारी ग्रामनिधी ७८.५% व ज.रो.यो.५१% एवढी आहे. प्रलंबित ५६६ अपहार प्रकरणांचा (ग्रामनिधी-२७७ व ज.रो.यो.२८९=५६६) तालुकास्तरावर ग्रामसेवक व ग्राम विकास अधिकारी यांच्या आढावा बैठका घेऊन अपहार प्रकरणात गुंतलेल्या रकमा वसुली करुन अपहार प्रकरणे अंतिमरित्या निकाली काढण्याच्या सुचना देण्यात आल्या असून याबाबत जिल्हा स्तरावर अपहार प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी शिबिरे आयोजित करण्यात येत असून या बाबत धडक मोहिम हाती घेण्यात आली आहे.

३. अपहाराची प्रकरणे निर्माण होण्याची सर्वसाधारण कारणे.---

(अ) मुल्यांकन वेळेवर उपलब्ध न होणे,

(ब) मोठ्या प्रमाणात कामांची संख्या,

(क) तांत्रिक कर्मचाऱ्यांची कमतरता.

**सचिवांची साक्ष :-**

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ११ मे, २०१० रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर प्रकरणाबाबत असा खुलासा केला की, ग्रामपंचायतीमार्फत जे बांधकाम करण्यात येते त्याचे वेळेवर मुल्यांकन होत नाही त्यामुळे लेखापरिक्षणात सदर बाब संशयित अपहार म्हणून दर्शविली जाते. समितीने सदर बाब निर्देशनास आणल्यानंतर याबाबत मोहिम हाती घेण्यात आली व त्यात ग्रामनिधी संबधातील २९८ प्रकरणे आणि जवाहर रोजगार योजने संबंधातील २६५ प्रकरणे निकाली काढण्यात आलेली

आहेत. समितीने सदर प्रकरणाबाबतची सद्यस्थिती काय आहे या बाबतची विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे स्पष्टीकरण दिले की, ग्रामनिधी योजनेच्या अंतर्गत १,५४,९७,४९८ इतकी रक्कम व जवाहर रोजगार योजनेतंर्गत ३,३६,०९,६८२ इतकी रक्कम वसूल करावयाची आहे. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, आपण कार्यभार स्वीकारल्यापासून आतापर्यंत कोणते प्रयत्न करण्यात आले व किती रक्कम वसूल करण्यात आली. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, आतापर्यंतच्या काळात १० कोटी रुपये समायोजित झालेले आहेत आणि ५ कोटी समायोजित होणे शिल्लक आहे. अपहारामध्ये गुंतलेल्या ग्रामसेवकांची संख्या ४०९ असून ग्रामनिधीमध्ये गुंतलेल्या ग्रामसेवकांची संख्या ४०२ आणि जवाहर रोजगार योजनेतंर्गत ३१४ जण गुंतलेले आहेत यात ग्रामसेवक तसेच सरपंच यांचा देखील समावेष आहे. त्यावर समितीने प्रलंबित अपहारीत रकमेसंदर्भात मुल्यांकन करुन कोणाकडून किती रक्कम येणे बाकी आहे याबाबतची माहिती देण्याबाबत निदेश दिले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, ११ ग्रामसेवकांना निलंबित करण्यात आलेले आहे, २२ ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी यांचेवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. ४ ग्रामसेवकांची विभागीय चौकशी सुरु आहे व १५ प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. याबाबतची सद्यस्थिती काय आहे त्यावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सदर माहिती नंतर सादर करतो असे सांगितले. मूल्यांकन वेळेवर उपलब्ध न होणे, मोठ्या प्रमाणात कामांची संख्या व तांत्रिक कर्मचाऱ्यांची कमतरता या तीन प्रमुख कारणामुळे जिल्हापरिषदेमध्ये अपहाराची प्रकरणे निर्माण होतात असे सदर अपहार प्रकरणासंदर्भात नमूद करण्यात आले आहे. परंतु यापुढे असे प्रकार घडू नयेत म्हणून तीन मुद्यांच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली याबाबत विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, पूर्वी प्रत्येक जिल्ह्याकरता डी. आर. डी. ए. साठी डेप्युटी अकाऊटन्ट आणि डी. ई पदे होती त्यामुळे नियमितपणे मुल्यांकन होत असे परंतु आता ही पदे रद्द झाल्यामुळे ग्रामपंचायतीकडील कामाचे स्वरुप वाढलेले आहे त्यामुळे मुल्यांकनासाठी वेळ लागतो. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की मुल्यांकनासाठी वेळ लागतो ही बाब समजण्यासारखी आहे परंतु रक्कमेचा अपहार होणे ही बाब योग्य नाही.

**अभिप्राय व शिफारशी :**

ठाणे जिल्हापरिषदेतंर्गत ग्रामपंचायत विभागाकडील अपहार प्रकरणाबाबत मुख्य लेखापरिक्षकांच्या अभिप्रायासंदर्भात जिल्हापरिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहिती व साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, ठाणे जिल्हापरिषदेच्या पंचायत विभागाकडे सन २००४ अखेरपर्यंत अपहाराची एकूण ४५९ प्रकरणे प्रलंबित असून त्यात १,७८,७०,५१६ इतकी रक्कम गुंतलेली आहे. प्रकरणे निकाली काढण्याचे प्रमाण अत्यल्प असल्यामुळे ग्रामनिधीची फार मोठी रक्कम अडकून पडलेली आहे. प्रलंबित

प्रकरणे निकाली काढत असतांना संबंधितावर कोणतीही दंडात्मक किंवा ठोस कारवाई करण्यात आल्याचे दिसून येत नाही. तसेच जवाहर रोजगार निधीचा एकूण ३२४ अपहाराच्या प्रकरणात एकूण रक्कम रुपये ३,७४,००,०१३.८२ गुंतली असून त्यापैकी केवळ ३० प्रकरणे निकाली काढली असून उर्वरीत प्रकरणे प्रलंबित आहेत. **ठाणे जिल्हापरिषदेतंर्गत अपहाराच्या प्रकरणाची संख्या सातत्याने वाढत आहे तसेच सदर प्रकरणे ही फार जुनी आहेत यावरुन अपहाराच्या प्रकरणात संबंधितांवर वेळच्या वेळी योग्य ती दंडात्मक कार्यवाही करण्यात येत नसल्याने त्यांचे प्रमाण कमी होण्याऐवजी वाढत असल्याचे दिसून येत आहे. तसेच ग्रामपंचायतीकडून करण्यात आलेल्या कामांचे मूल्यांकन वेळेवर न होणे,मोठ्या प्रमाणात कामांची संख्या तसेच तांत्रिक कर्मचाऱ्यांची कमतरता या कारणामुळे ग्रामपंचायत स्थरावरील संशयीत अपहारांची संख्या वाढत असल्याबाबतची माहिती सचिवांच्या साक्षी दरम्यान उघड झाली. परंतु सदर तांत्रिक अडचणीचा भाग वगळता रक्कमेचा अपहार व असे करणाऱ्यांवर कारवाई करणे या दोन वेगळ्या बाबी असून अपहार करणाऱ्यावर वेळीच कारवाई होणे देखील आवश्यक आहे अन्यथा रक्कम अपहारीत करणाऱ्या संबंधितांवर कोणत्याही प्रकारचा (Deterrance) वचक राहणार नाही. सबब शासनाने जि.प. अतंर्गत होणाऱ्या अपहारीत प्रकरणांची संख्या व त्यात गुंतलेली रक्कत लक्षात घेता विभागीय स्तरावर एखादे पथक स्थापन करुन त्यांच्यामार्फत अशा कामांचे मूल्यांकन करुन घेवून अपहार झाल्याचे दिसल्यास संबंधितावर तात्काळ कारवाई करावी जेणे करुन अशी प्रकरणे वर्षानुवर्ष प्रंलबित राहणार नाहीत. अशी शिफारस समिती करीत आहे.**

तसेच उपरोक्त वस्तुस्थिती वरुन ठाणे जिल्हापरिषदेकडून अपहाराच्या प्रकारणाकडे गांभिर्याने लक्ष दिल्याचे दिसून येत नाही किंबहूना जि. प. प्रशासन त्याच्याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येते. सदर प्रकरणात गुंतलेल्या शासनाच्या निधीचा आकडा पाहिल्यावर तर याबाबतची खात्रीच पटते की जि.प. चा कारभार किती निष्काळजीपणे चालविण्यात येत आहे. **जिल्हापरिषद, ठाणे येथे झालेल्या बैठकीच्या वेळी संपूर्ण अपहारीत रक्कमेसंदर्भातील अहवाल समितीला पाठविण्याबाबत निदेश देण्यात आले होते. परंतु सदर बैठकीत दिलेले निदेश देवून जवळपास दोन वर्षाचा कालावधी होऊन देखील समाधानकारक माहिती पाठविण्यात आलेली नाही. अपहारीत प्रकरणाची संख्या व त्यात गुंतलेली शासनाची रक्कम लक्षात घेता ज्या तत्परतेने कार्यवाही करणे अपेक्षित आहे ती झालेली दिसून येत नाही. यावरुन असे दिसून येते की, समितीने दिलेल्या निदेशाचे पालन केल्याचा आभास निर्माण करण्याचा प्रयत्न जिल्हा परिषद प्रशासन करत आहे. सबब समिती अशी शिफारस करते की संपूर्ण अपहाराच्या प्रकरणामध्ये शासनाच्या अडकलेल्या निधीचा फेर आढावा घेऊन संबंधितांवर योग्य ती कडक कारवाई करण्यात यावी तसेच ज्यांनी या प्रकरणाकडे गांभिर्याने पाहिले नाही व कारवाई करण्यात टाळाटाळ केली त्यांच्यावर देखील कारवाई करण्यात यावी. व याबाबतची माहिती समितीला** सहा महिन्याच्या आत पाठविण्यात यावी.

# परिशिष्ट

## समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त

मंगळवार, दिनांक २१ ऑगस्ट, २००७

स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, सांगली

उपस्थिती :

१. श्री. राजन पाटील, वि.स.स. समिती प्रमुख.

२. श्री. नाना पंचबुध्दे, वि.स.स.

३. श्री. दिलीप बनसोड, वि.स.स.

४. श्री. रमेशचंद्र बंग, वि.स.स.

५. श्री. श्रीनिवास देशमुख (गोरठेकर), वि.स.स.

६. श्री. विरेंद्र जगताप, वि.स.स.

७. श्री. सुनिल केदार, वि.स.स.

८. श्री. कैलास पाटील, वि.स.स.

९. श्री. संजय राठोड, वि.स.स.

१०. श्री. अतुल देशकर, वि.स.स.

११. श्री. साहेबराव घोडे, वि.स.स.

१२. श्री. शिवाजीराव पाटील, वि.प.स.

१३. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

१४. श्री. रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. वि. वा. देशमुख, उप सचिव,

(२) श्री. आर. आर. काठे, समिती अधिकारी,

(३) श्री. श. बा. गायकवाड, कक्ष अधिकारी.

मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी (लेखा) :

श्री. डी. डी. द्वारके, मुख्य लेखा परिक्षक.

विभागीय प्रतिनीधी :

१. श्री. र. ना. अंबरित, उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.

२. श्री. कृ. शे. कांबळे, अवर सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई.

**सांगली जिल्हा परिषदेचे अधिकारी :**

१. श्री. गोकुळ मवारे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सांगली.

२. श्री. रविंद्र शिंदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.सांगली.

३. श्री. रविंद्र शेळके, मुख्य लेखा वित्त अधिकारी, जि.प.सांगली.

४. श्री. प्रभाकर गावडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), जि.प.सांगली.

५. श्री. संतोष जोशी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जि.प.सांगली.

६. श्री. एम. आर. पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क), जि.प.सांगली.

७. श्री. ना. भि. पाटील. शिक्षणाअधिकारी (प्रा.), जि.प.सांगली.

८. श्री. बी. पी. कांबळे, शिक्षणाअधिकारी (माध्य.), जि.प.सांगली.

९. श्री. डी. एस. जगताप, शिक्षणाअधिकारी (निरंतर शिक्षण), जि.प.सांगली.

१०. श्री. रजीनकांत शिंदे, कार्यकारी अभियंता (बांधकाम), जि.प.सांगली.

११. श्री. के. बी. सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता (ल.पा.), जि.प.सांगली.

१२. श्री. ए. एच. सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु), जि.प.सांगली.

१३. श्री. एन. टी. शिसोदे, कृषि विकास अधिकारी, जि.प.सांगली.

१४. डॉ. एल. एस. साळे, जिल्हाआरोग्य अधिकारी, जि.प.सांगली.

१५. श्री. एम. ए. पाचपिंडे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि.प.सांगली.

१६. श्री. ए. एस. माने, प्रकल्प संचालक, डी.आर.डी.ए., जि.प.सांगली.

१७. श्री. एच. बी. कांबळे, प्र.समाजकल्याण अधिकारी, जि.प.सांगली.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील सांगली जिल्हा परिषदेशी संबंधीत असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २३ ऑक्टोबर, २००७**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, ठाणे**

**उपस्थिती :**

१. श्री. राजन पाटील, वि.स.स.

२. श्री. रमेशचंद्र बंग, वि.स.स.

३. श्री. माणिकराव जगताप, वि.स.स.

४. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.

५. श्री. सुभाष बने, वि.स.स.

६. श्री. विरेंद्र जगताप, वि.स.स.

७. श्रीमती मनिषा निमकर, वि.स.स.

८. श्री. कैलास पाटील, वि.स.स.

९. श्री. विश्वास नांदेकर, वि.स.स.

१०. श्री. संजय राठोड, वि.स.स.

११. श्री. अतुल देशकर, वि.स.स.

१२. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

१३. श्री. रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. वि.वा.देशमुख, उप सचिव,

(२) श्री. आर.आर.काठे, समिती अधिकारी,

(३) श्री. श.बा.गायकवाड, कक्ष अधिकारी.

**मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी (लेखा) :**

श्री. डी. डी. द्वारके, मुख्य लेखा परीक्षक.

**विभागीय प्रतिनिधी :**

श्री. प्र. बा. हिर्लेकर, उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.

**ठाणे जिल्हा परिषदचे अधिकारी :**

१. श्री. सु. रा. हजारे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, ठाणे.

२. श्री. एस. एन. तायडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण).

३. श्री. व्ही. आर. नाईक, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत).

४. श्री. योगेश महांगडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (जलस्वराज्य प्रकल्प).

५. श्री. सु. रा. शिंदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी.

६. श्री. बी.एम.वराळे, प्रकल्प संचालक, ठाणे.

७. श्री. रविंद्र सावंत, मुख्य लेखा व वित्त अधिकारी.

८. श्री. योगेश महांगडे, उप मु.का.अ., जलस्वराज्य.

९. डॉ. सुधाकर कोकणे, जिल्हा आरोग्य अधिकारी.

१०. श्री. सुभाष जाधव, का.अ., प्रधानमंत्री ग्राम सडक योजना.

११. श्री. आर. बी. शिरसाट, जि.स.क.अ.

१२. श्री. सुभाष धावटे, कृषि विकास अधिकारी.

१३. डॉ. सु. चि. म्हस्के, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी.

१४. श्री. व्ही. उस. कान्हेरे, जि.कृ.अ.

१५. श्री. एस. ए. पाटील. शिक्षणाधिकारी (माध्यमिक).

१६. श्री. बोरसे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक).

१७. श्री. एम. बी. वाघमारे, प्रभारी उप शिक्षणाधिकारी.

१८. श्री. संजय बाविस्कर, कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा).

१९. श्री. प्र. भा. चव्हाण, कार्यकारी अभियंता (लघु पाटबंधारे).

२०. श्री. व्ही. डब्ल्यु. भिवापूरकर, कार्यकारी अभियंता (बांधकाम).

२१. श्री. सुभाष जाधव, कार्यकारी अभियंता (पूर्व), प्रधानमंत्री ग्रामसडक योजना.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील ठाणे जिल्हा परिषदेशी संबंधीत असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

## शुक्रवार, दिनांक २६ जून, २००९
## विधान भवन, मुंबई

**उपस्थिती :**

१. श्री. सुभाष ठाकरे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२. श्रीमती अनुसया खेडकर, वि.स.स.
३. श्री. विष्णु सावरा, वि.स.स.
४. श्री. हेमंत पटले, वि.स.स.
५. श्री. विक्रम वसंतराव काळे, वि.प.स.
६. श्री. रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**
श्री. म. सु. वाघमारे, समिती अधिकारी.

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्रीमती शर्वरी गोखले, अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,
(२) श्री. एन. अरुमुगम, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग,
(३) श्री. सुनील पोरवाल, प्रधान सचिव, जलसंधारण विभाग,
(४) श्री. अजित कुमार जैन, प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग,
(५) श्री. संजय कुमार, सचिव, शालेय शिक्षण विभाग,
(६) श्री. मनुकुमार श्रीवास्तव, सचिद, नगरविकास विभाग,
(७) श्री. बलदेव सिंह, सचिव, ग्रामविकास विभाग,
(८) श्री. एस. के. गोयल, सचिव, पशुसंवर्धन विभाग,
(१०) श्री. डी. एस. झगडे, आयुक्त,
(११) श्री. श्याम वर्धन, जिल्हाधिकारी, सांगली,
(१२) श्री. गोकुळ बबन मवारे, मुख्य कार्यकारी अधिकारी, सांगली.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात सांगली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, प्रधान सचिव, जलसंधारण विभाग, प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शालेय शिक्षण विभाग, सचिव, नगरविकास विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, पशुसंवर्धन विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. सांगली यांची साक्ष घेतली.

**मंगळवार दि. ११ मे, २०१०**

**विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(३) श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

(४) श्री. बापुसाहेब पठारे, वि.स.स.

(५) श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

(६) श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.

(७) श्री. विष्णु सावरा, वि.स.स.

(८) प्रा. सुरेश नवले, वि.प.स.

(९) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(१०) ॲड. उषा दराडे, वि.प.स.

(११) श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**
श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्री. प्रदीप व्यास, प्रधान सचिव, वित्त ( व्यय ),

(२) श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग,

(३) डॉ. पी. एम. मीना, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग,

(४) श्री. प्रकाश हिर्वेकर, सह सचिव, ग्रामविकास विभाग व जल संधारण विभाग,

(५) श्री. मल्लीनाथ कलशेट्टी, उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,

(६) श्री. एकनाथ मोरे, उप सचिव, ग्राम विकास विभाग,

(७) श्री. गो. डो. तायडे, उप सचिव, रोजगार हमी योजना,

(८) श्री. सु. स. सनगर, उप सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

(९) श्री. निपुण विनायक, उप सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग,

(१०) श्री. प्रकाश साबळे, अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

(११) श्री. के. बी. पाटील, शिक्षणाधिकारी, ठाणे, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.

**जिल्हा परिषद, ठाणे**

(१) श्री. एच. के. जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी,

(२) श्री. रवींद्र शिंदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,

(३) श्री. म. स. साळुंखे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००३-२००४ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात ठाणे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, वित्त ( व्यय ), प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, उप सचिव, रोजगार हमी योजना, उप सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. ठाणे यांची साक्ष घेतली.

**बुधवार दिनांक १२ मे, २०१०**

**स्थळ : विधान भवन मुंबई**

**उपस्थिती :**

१. श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

३. श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

४. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

५. डॉ. खुशाल बोपचे, वि.स.स.

६. श्री. सुरेश खाडे, वि.स.स.

७. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.

८. श्री. विष्णू सावरा, वि.स.रा.

९. श्री. अनिल राठोड, वि.स.स.

१०. श्री. दादाजी भुसे, वि.स.स.

११. प्रा. सुरेश नवले, वि.प.स.

१२. ॲड. उषा दराडे, वि.प.स.

१३. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**
श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.

**मुख्य लेखापरिक्षक स्थानिक निधी (लेखा ) :**

श्री. शं. धे. चव्हाण, सहमुलेप, स्थानिक निधी,लेखा.

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्रीमती शर्वरी गोखले, अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,

(२) श्री. संजयकुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग,

(३) श्री. सुनील पोरवाल, प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग,

(४) श्री. पी. एस. मीना, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग,

(५) श्रीमती मालिनी वि. शंकर, प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग,

(६) श्री. नानासाहेब पाटील, प्रधान सचिव, कृषी विभाग,

(७) श्रीमती वंदना कृष्णा, सचिव, महिला व बालविकास विभाग,

(८) श्री. राजेश अग्रवाल, सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग,

(९) डॉ. प्रदीप व्यास, सचिव, वित्त विभाग,

(१०) श्री. गं. म. कंधारे, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग,

(११) श्री. सुब्रत रथो, सचिव, ऊर्जा,

(१२) श्री. आर. जी. सय्यद, उप सचिव, ग्रामविकास विभाग,,

**जिल्हा परिषद, ठाणे,**

(१) श्री. एच. के. जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी,

(२) श्री. रवींद्र शिंदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,

(३) श्री. पां. द. करवंदे, अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे,

(४) श्री. अशोक पवार , वरिष्ठ पोलीस निरीक्षक, माणिकपूर पोलीस स्टेशन, ठाणे ग्रामीण.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात ठाणे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, प्रधान सचिव, कृषी विभाग, सचिव, महिला व बालविकास विभाग, सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, सचिव, वित्त विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सचिव, ऊर्जा विभाग, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, ठाणे यांची साक्ष घेतली.

**दिनांक ९ डिसेंबर, २०१०**

**स्थळ : विधान भवन नागपूर**

**उपस्थिती :**

(१) श्री. बबनराव शिंदे, वि. स. स. तथा समिती प्रमुख.

(२) श्री. दिलीपकुमार सानंदा, वि. स. स.

(३) श्री. बच्चू ऊर्फ ओमप्रकाश कडू, वि. स. स.

(४) श्री. विष्णू सावरा, वि. स. स.

(५) श्री. विजयराव औटी, वि. स. स.

(६) श्री. दादाजी भुसे, वि. स. स.

(७) श्री. नितीन भोसले, वि. स. स.

(८) ॲड. उषा दराडे, वि. प. स.

(९) श्री. सय्यद पाशा पटेल, वि. प. स.

(१०) श्री. दिवाकर रावते, वि. प. स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.
श्री. विलास आठवले, अवर सचिव.
श्री. सुभाष नलावडे, कक्ष अधिकारी.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बैठकीत समितीच्या पहिल्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन तो किरकोळ सुधारणासह संमत केले.

शामुना-एचबी-२२२५-मविसना-१२-२०१०-७६० प्रती पीए ५*